
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ११२८

सरस्वती

चरित्र १५२८



# चरित्रमाला

REFBK-0003321

चरित्र

७१७८९

७।६।७८

१५२५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

अनुक्रम........................ वि: चरित्र

क्रमांक ........ नों: दि: ........

संत-चरित्र माला । १

श्रीमत्

# वासुदेवानंद सरस्वती

अर्थात्

# टेंबेस्वामी महाराज

पुरस्कार

श्रीवामनराव गुळवणीमहाराज

के. ल. पुराणिक, बी.ए.

क्र. 3329

संत धर्माचें धर्मक्षेत्र ।
संत स्वरूपाचें सत्पात्र ।
नांतरी पुण्याची पवित्र ।
पुण्यभूमी ॥



REFBK-0003321
REFBK-0003321

मूल्य एक रुपया

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ,
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्रा.लि.करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

प्रथमावृत्ति, शके १८८०

मूल्य एक रुपया

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अ. चि. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार पेठ, पुणें २.

श्री : ११२

# श्रीगुळवणीमहाराजांचा आशीर्वाद

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

श्री. प. प. सद्गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज यांचें संक्षिप्त चरित्र, श्री. के. ल. पुराणिक यांनीं संकलित केलेलें वाचून अत्यंत समाधान वाटलें. सर्वसंकल्पसंन्यासी श्रीमहाराजांचें दिव्य चरित्र आणि श्री. पुराणिकांसारखे चिकित्सा व भावना या दोन्हीहि बुद्धिशक्तींचा समन्वय झालेले लेखक हा अपूर्व योग येथें जमून आलेला आहे. ' सर्वभूतहिते रताः ' या भूमिकेवर नित्य असणाऱ्या सत्पुरुषांचीं चरित्रें हींच संसारसमुद्रांत दीपस्तंभाप्रमाणें खरीं मार्गदर्शक आहेत. अशा चरित्रांचें सद्भावनेनें चिंतन करून तीं व्यक्त करणारे लेखक, सर्वसामान्य जनतेपुढें अशा चरित्ररूपानें हिताहितांचें सप्रयोग प्रदर्शन करणारे संस्कृतिरक्षक आहेत यांत शंका नाहीं. श्री. पुराणिक यांच्याकडून या संक्षिप्त चरित्राप्रमाणें श्रीमहाराजांचें विस्तृत चरित्रहि निर्माण केलें जाऊन त्यायोगें सर्वांनाच कल्याणमार्गाचें प्रकाशन केल्याचें श्रेय त्यांना मिळो हीच ईश्वरचरणीं प्रार्थना आहे.

**वा. द. गुळवणी**

# निवेदन

सदा संतांपाशीं जावें । त्यांच्या जवळी बैसावें ।। १ ।।
उपदेश ते न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी ।। २ ।।
तेचि उपदेश होती । त्यांहीं कष्ट नष्ट होती ।। ३ ।।
वासुदेव म्हणे संत । संगें करिती पसंत ।। ४ ।।

श्रीमत् श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांच्या लौकिक चरित्राची वाचकांस थोडक्यांत ओळख करून द्यावी आणि त्यांच्या थोर कार्याचा अल्प परिचयहि त्यांना घडवावा अशा हेतूनें हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे. वास्तविक श्रीटेंबे स्वामीं-सारख्या महान् सत्पुरुषाचें चरित्र यथातथ्य रेखाटणे हें माझ्या-सारख्या सामान्य लेखकाचें काम नव्हे, व या ठिकाणीं तें काम करण्याचा माझा हेतूहि नाहीं. परंतु लहान मूल आपल्या वडिलांच्या पायाजवळ बसून जसे चार बोबडे शब्द बोलतें, तसाच हा माझा लेखनाचा प्रयत्न आहे. " सत्पुरुषांचें चरित्र तें कसलें ? ज्यांचें चरित्र संपलेलें असतें तेच खरे सत्पुरुष होत, " असे यथार्थ उद्गार एका थोर सत्पुरुषानेंच काढले आहेत; आणि म्हणून आध्यात्मिक वैभव हाच ज्यांचा खरा मोठेपणा त्यांचीं लौकिक चरित्रें लिहिण्याला कांहीं विशेष अर्थ रहात नाहीं. तथापि संतांच्या माहीत असलेल्या चरित्राचें गुणगान करणें हेंहि निश्चित कल्याणकारक असल्यामुळें साधकांनीं आपापल्या बुद्धीप्रमाणें संत-चरित्रें लिहिण्याचा प्रयत्न करणें हेंहि स्वाभाविक व योग्यच आहे.

श्रीटेंबेस्वामींसारख्या थोर सत्पुरुषाकडून ज्यांना प्रत्यक्ष उपदेश मिळाला असेल ते खरोखरच भाग्यवान होत. तथापि

स्वामीमहाराज समाधिस्थ झाल्याला आतां चाळीस वर्षांहून अधिक वर्षें होऊन गेल्यामुळें आतां कोणाला त्यांचा प्रत्यक्ष उपदेश मिळण्याचा अर्थातच संभव नाहीं. तथापि आरंभीं दिलेल्या श्रीस्वामींच्या अभंगांत त्यांनींच सांगितल्याप्रमाणें त्यांचा उपदेश मिळण्यासारखा नसला तरी त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी किंवा त्यांच्यासंबंधीं माहीतगारांनीं लिहून ठेवलेल्या गोष्टी अभ्यासणें, व त्यांतील जेवढा भाग आपल्या आचरणांत आणतां येण्यासारखा असेल तेवढा आणणें एवढें आपणांस खचित करतां येण्यासारखें आहे. आणि अशा 'संतांच्या गोष्टी ऐकून' आपले 'कष्ट नष्ट होतील' अशी ग्वाही त्यांनीं स्वतःच दिलेली असल्यामुळें, या गोष्टींचा आपला अभ्यास कल्याणकारक आहे अशी खूणगांठ निष्ठावंत साधकांनीं आपल्या मनाशीं बांधण्यास कोणतीच हरकत नाहीं.

संन्यास घेतल्यावर महाराजांचा पहिला चातुर्मास शके १८१३ सालीं श्रीक्षेत्र उज्जयिनी येथें झाला; व शके १८३५ मध्यें श्रीगरुडेश्वर येथें तेविसावा चातुर्मास होऊन शके १८३६ मध्यें चातुर्मास सुरू होण्यापूर्वींच महाराज समाधिस्थ झाले. म्हणजे संन्यासाश्रम घेण्यापूर्वींच्या कार्याचा विचार बाजूला ठेवला तरी पुढें चोवीस वर्षें महाराजांचें भ्रमण म्हणजे पदयात्रा सर्व भारतभर अखण्डपणें चालू होती. या यात्रेंत, चातुर्मासांत एके ठिकाणीं राहणें भागच असल्यामुळें त्या वेळीं जो काय थोडी विश्रांति मिळेल तेवढीच; पण तेवढे दोन महिने वगळल्यास महाराजांचा मुक्काम सहसा चार-सहा दिवसांहून अधिक असा एके ठिकाणीं कोठेंहि होत नसे. ज्याच्या अंतरंगांत परमेश्वरी प्रकाशाचा नंदादीप अखंड तेवतो आहे आणि भक्तीला भुललेला भक्तवत्सल परमात्मा ज्याच्याबरोबर सदैव राहून सुखसंवाद करीत आहे अशा या महासिद्धानें

अर्धनग्न स्थितींत, कधीं अर्धपोटीं तर कधीं निव्वळ उपाशी राहून थंडी, वारा, ऊन सहन करीत दोन तपें रात्रंदिवस भारतभर हिंडत रहावें, आणि हजारों–लाखों लोकांना दुःखमुक्त करून, सन्मार्गाला लावून, त्यांना प्रभुप्राप्तीचा सुलभ व खात्रीचा मार्ग प्रत्यक्ष दाखवून कृतार्थ करावें ही खरोखरच आपणा भारतीयांच्या व विशेषतः महाराष्ट्रीयांच्या भाग्याची गोष्ट आहे. शास्त्रशुद्ध अशा कडक धार्मिक आचारावर महाराजांचा विशेष कटाक्ष होता, व त्यांनीं स्वतः तो आचार पाळण्याची एवढी पराकाष्ठा करून दाखविली कीं भगवान् रामकृष्ण परमहंस यांनीं स्वतःसंबंधीं म्हटल्याप्रमाणें महाराजांची 'अवस्थाहि उदाहरणादाखल' होती असेंच म्हणावयास पाहिजे. धार्मिक आचरणासंबंधींच्या महाराजांच्या आग्रहामुळेंच इंग्रजी शिक्षणाची व संस्कृतीची विशेष छाप पडलेले लोक महाराजांकडे फारसे आकर्षित झाले नाहींत असें वाटतें. तथापि त्यामुळें मराठी भाषा न जाणणाऱ्या लोकांना महाराज पुष्कळसे अज्ञातच राहिले. यापुढें एखाद्या लेखकानें महाराजांचें चरित्र इंग्रजींतून प्रसिद्ध केल्यास, हजारों भारतीयांना या थोर विभूतीची थोडीतरी ओळख होऊं शकेल. असो.

'स्वतः प्रयोग करून पहा आणि त्यांत जें कांहीं प्रत्ययाला येईल तेवढेंच खरें माना' असा भौतिक शास्त्रांचा दंडक आहे. त्या दृष्टीनें महाराजांचें चरित्र हें जडवाद्यांना आणि अज्ञेयवाद्यांना एक तऱ्हेचें आव्हानच आहे. निष्ठावंत साधकांकरितां तर हें चरित्र म्हणजे एक ज्ञानदीपच असून, या चरित्राची कास धरली असतां साधकांच्या मार्गातील कसलेंहि संकट निश्चयानें दूर होईल व ते साधनेंत अधिकाधिक अग्रेसर होत जातील यांत कांहींच शंका वाटत नाहीं.

या पुस्तकांत पान २१ वर महाराजांच्या पत्नी सौ. अन्नपूर्णाबाई यांच्या मृत्यूची हकीकत दिलेली आहे, त्यासंबंधीं थोडा खुलासा करावयास हवा. त्यांना स्वत:लाहि आपली जीवितयात्रा आज संपणार याची स्पष्ट कल्पना होती. अन्नपूर्णाबाईंनीं गंगोदकानें स्नान करून स्वत:साठीं गोमयानें जमीन सारविली, व त्यावर दर्भ अंथरून पुन्हां स्नान केलें. धूतवस्त्र नेसून हळद-कुंकू लावलें व ब्राह्मण स्त्रियांना बोलावून आपले अलंकार दान केले. सावधपणानें परलोकीं जातां यावें व पुन्हां जन्म येऊं नये यासाठीं त्यांनीं महाराजांची प्रार्थना केली. तसेंच ' महाराजांनीं आपलें सत्यस्वरूप मला दाखवावें ' अशीहि त्यांनी विनंती केली. त्यावर ' तुझ्या इच्छेप्रमाणें तुला फल प्राप्त होईल' असा महाराजांनीं आशीर्वाद देतांच, पतिचरणावर मस्तक ठेवून ' हर हर श्रीगुरुदेवदत्त ' असें म्हणून त्यांनीं आपलीं जीवनयात्रा संपविली. अशी हकीकत महाराजांचे शिष्य श्रीगांडामहाराज यांनीं लिहिलेल्या महाराजांच्या चरित्रांत दिली आहे.

महाराजांच्या चरित्राची सर्व-सामान्य वाचकांना ओळख करून देणें एवढाच या चरित्राचा उद्देश आहे. आणि थोर पुरुषांनीं थोरपणा कसा प्राप्त करून घेतला हें कळण्याच्या दृष्टीनें त्यांच्या चरित्राच्या उत्तरार्धापेक्षां पूर्वार्धच पुष्कळदा अधिक महत्त्वाचा असतो. म्हणून महाराजांच्या चरित्राच्या पूर्वार्धांतील महत्त्वाच्या बहुतेक सर्व घटना यांत दिलेल्या आहेत. मात्र उत्तरार्धांत म्हणजे प्रकरण सातपासून पुढचा भाग पृष्ठमर्यादेमुळें त्याहूनहि संक्षिप्त करावा लागल्यामुळें, त्या काळांतील अगदीं निवडक घटनांचाच उल्लेख येथे करतां आला. तथापि महाराजांच्या चरित्रांतील कोणतीहि महत्त्वाची गोष्ट यांत वगळली जाणार नाहीं याबद्दल

काळजी घेतली आहे. ज्या वाचकांना महाराजांचें विस्तृत चरित्र वाचण्याची इच्छा होईल त्यांनीं 'श्रीगुरुदेवचरित्र'* आणि '**श्री० प. प. वासुदेवानंद सरस्वती (टेंब्ये) स्वामींचें चरित्र**' हीं दोन पुस्तकें मुळांतूनच वाचावींत.

या लहानशा पुस्तकाला महाराजांचे अनुग्रहीत शिष्य श्री. वामन द. गुळवणीमहाराज, पुणें, यांनीं आनंदानें आशीर्वाद लिहून दिला व स्वत: प्रकाशित केलेल्या चरित्राचा उपयोग करण्याची परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. तसेंच श्री. ना. सि. निगुडकर, मुंबई यांनीं श्रीगरुडेश्वर क्षेत्रा-संबंधीं जी महत्त्वाची माहिती लिहून दिली त्याबद्दल त्यांचे आणि वरील दोनहि चरित्रांच्या लेखकांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतों.

या संतचरित्राच्या वाचनानें वाचकांचे साधक होवोत, आणि साधकांना साधनेची अखंड स्फूर्ति व यश प्राप्त होवो अशी श्रीमहाराजांच्या चरणीं नम्रपणें प्रार्थना करतों.


'विजयादशमी,' पुणें २.<br>
दि. २१ ऑक्टोबर १९५८

**के. ल. पुराणिक**

---

* संकलनकर्ता–श्री. द. धुं. कवीश्वर, प्रकाशक–श्री. वा. द. गुळवणी २० नारायण पेठ, पुणें २. ( किंमत २ रुपये ).

✦ लेखक–श्री. प. प. योगानंद सरस्वती ( गांडामहाराज ) सं. गुंज, जि. परभणी, मराठवाडा. प्रकाशक—द. नी. पांडव, भारतीय नुजूमी प्रेस, अफजल गंज–हैदराबाद. (किंमत दोन रुपये).



**श्रीवासुदेवानंद सरस्वती**

( गरुडेश्वर येथील समाधि-स्थान )

# बालतपस्वी वासुदेव : १

* * * * * * * * * * * * * *

पूर्वीच्या सावंतवाडी संस्थानच्या सरहद्दीनजिक हरीभट्ट टेंबे या नांवाचे एक सच्छील वैदिक ब्राह्मण रहात असत. यांनीं सुमारें सवाशें वर्षांपूर्वी स्वहस्तें लिहिलेली श्रीगुरुचरित्राची पोथी अद्यापि उत्कृष्ट स्थितींत आहे. कालांतरानें वे. हरीभट्ट तें गांव सोडून सावंतवाडीपासून आठ-नऊ मैलांवर असलेल्या माणगांवीं वे. सीतारामभट कोनकर यांचे घरीं आश्रयासाठीं आले, व पुढें त्याच गांवांत स्थायिक झाले. वे. कोनकरांनीं आपली मुलगी येसूबाई ही हरीभट्टजींचा वडील मुलगा गणेश यास दिली, व लग्नानंतर तिचें नांव रमाबाई या असें ठेवण्यांत आलें. गणेशभटजी व रमाबाई या पुण्यशील पतिपत्नींना शके १७७६ (इ.स.१८५५) श्रावण वद्य पंचमी रविवारीं सकाळीं पहिला मुलगा झाला. या मुलाचें नांव वासुदेव असें ठेवण्यांत आलें.

गाणगापुरास बारा वर्षे सेवा केल्यावर गणेश भटजींना ‘ मी तुमच्यावर प्रसन्न आहे, तुम्हीं आतां घरीं जाऊन रहा. याउपर गाणगापुरीं येण्याचें कारण नाहीं,’ असा श्रीदत्तात्रेयांचा दृष्टान्त झाल्यावर कांहीं दिवसांनीं वासुदेवाचा जन्म झाला. हा वासुदेव म्हणजेच वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी होत. वासुदेवाचें शिक्षण खाजगी शाळेंत तिसऱ्या वर्षींच सुरू झालें; पण त्यांचे खरे शिक्षक त्याचे आजोबा म्हणजे हरीभट्ट हेच होते. छोटया वासुदेवानें

रूपावळी, समासचक्र, अमरकोश इत्यादिकांचा अभ्यास भराभर पुरा केला, आणि नवव्या वर्षीच आजोबांनीं वासुदेवाची मुंज केली. मुंजीनंतर लगेच संध्या, गुरुचरित्र-वाचन, वेदाध्ययन इत्यादि गोष्टी त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें सुरू झाल्या. पुढें मात्र हरीभट्ट लवकरच वारले आणि वासुदेवाचें घरचें शिक्षण बंद झालें.

वे. तात्याभटजी उकिडवे व वे. भास्करभटजी ओळकर यांचे-कडे वासुदेवाचें वेदाध्ययन झालें. वासुदेवाचें वेदाध्ययन सोवळ्यांत राहून चाले, आणि नित्य नैवेद्य-वैश्वदेव करून नंतरच ते भोजन करीत. वासुदेवाच्या या कडक शास्त्रशुद्ध आचरणामुळें वेदमंत्रांची शक्ति-सिद्धि त्यांच्यांत बालवयांतच झाली, आणि वेदविद्या ही केवळ पुस्तकी विद्या नाहीं, तिच्यांत जिवंत सामर्थ्य आहे याचा प्रत्ययहि येऊं लागला. वेदाध्ययनानंतर याज्ञिकाचा अभ्यास झाल्या-वर वे. शंभूशास्त्री साधले यांचेजवळ वासुदेवानें संस्कृताचा आणि ज्योतिषशास्त्राचा कांहीं अभ्यास केला. एकादशीस कडकडीत उपास करावा, परान्न कधींहि घेऊं नये. कोणावरोवरहि वाद घालूं नये, ठरलेला नियम प्राणावर बेतली तरी मोडूं नये, कधींहि असत्य बोलूं नये, छत्री आणि पादत्राणें वापरूं नयेत, आईविषयीं अत्यंत नम्रता बाळगावी, आणि त्रिकाल स्नान करावें असा एखाद्या तपस्व्यास शोभण्यासारखा वासुदेवाचा आदर्श आणि विलक्षण आचार पाहून आजूबाजूच्या लोकांत वासुदेवाबद्दल मोठेंच कुतूहल आणि त्याहून अधिक आदर उत्पन्न झाला.

वासुदेव एकवीस वर्षांचा असतांना रांगणागड येथील श्री. बाबाजीपंत गोडे यांची मुलगी बायो इच्याबरोबर वासुदेवाचें लग्न झालें. वासुदेवाचे मनांत लग्न करावयाचें नव्हतें व ही मुलगी सुरूप नसून तिच्या पायांतहि थोडा अधूपणा होता; परंतु वे. उकिडवे

व वे. ओळकर या गुरुजींच्या शब्दाला मान देण्याकरितांच वासुदेवानें या लग्नास संमति दिली. लग्नानंतर लगेच वासुदेवानें स्मार्ताग्नीची दीक्षा घेतली व गायत्रीमंत्राचें एक पुरश्चरणहि केलें. नंतर गोमंतकांत ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां वासुदेव पेडणें येथें गेला; पण वडील आजारी पडल्यामुळें त्याला कांहीं महिन्यांतच घरीं परतावें लागलें. वडील म्हणजे गणेशभटजी शके १७९९ मध्यें (इ. स. १८७८) मरण पावले. यावेळीं वासुदेवाचें वय तेवीस वर्षांचें होतें.

वडील वारल्यानंतर घरची सर्व जबाबदारी वासुदेवावर म्हणजे आतां 'वासुदेवशास्त्री' यांचेवर आली. शास्त्रीबुवांच्या पत्नीचें नांव अन्नपूर्णाबाई असें होतें. शास्त्रीबुवांना आईविषयीं अत्यंत आदर असल्यामुळें ते आईच्या मनाविरुद्ध कधीं वागत नसत. तथापि घरांत सासू-सुनांचें अगदीं खडाष्टक होतें. आईला भिऊन वागत असूनसुद्धां शास्त्रीबुवांना घरांत उत्पन्न होणारी कटुता मुळींच कमी करतां आली नाहीं, आणि त्यामुळें कित्येक प्रसंगीं त्यांना आत्यंतिक मनस्ताप सहन करावा लागे. अशा कांहीं प्रसंगीं आपण घरदार सोडून नरसोबाच्या वाडीस जाऊन रहावें असें त्यांच्या मनांत येई.

वासुदेवशास्त्री यांचें सर्व अध्ययन सदाचारपूर्वक म्हणजे शास्त्राप्रमाणें वागून झालेलें असल्यामुळें त्यांना वेदमंत्रांची सिद्धि तरुण वयांतच प्राप्त झाली. सापाला जागच्याजागीं खिळवून टाकणें, दंगेखोर गाईला शांतपणें दूध देण्यास लावणें, पिशाच्चबाधा दूर करणें, असले त्यांच्या मंत्रसिद्धीचे अनेक चमत्कार माणगांवच्या आणि आसपासच्या गांवांतील लोकांना पहावयास मिळत असत.

## संसाराला त्रासलेले शास्त्रीबुवा : २
* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

एक रात्रीं शास्त्रीबुवांच्या स्वप्नांत एक ब्राह्मण आला व त्यांना म्हणाला, "तुम्ही नरसोबाचे वाडीस कां जात नाहीं? तुम्ही जाण्याचें ठरवाल तर आईची आज्ञा मिळेल आणि खर्चाची सोयहि होईल. लवकर तयारी करा." दुसरे दिवशीं आईची परवानगी मिळाली आणि पूर्वी करून दिलेल्या एका पत्रिकेचे अडीच रुपये मिळून शास्त्रीबुवा आनंदानें वाडीला निघाले. वाडीला पोंचण्यापूर्वी वाटेंत बोरगांव येथें शास्त्रीबुवांना दृष्टान्त झाला कीं, 'नरसोबाचे वाडीस श्रीगोविंदस्वामी म्हणून मोठे अधिकारी पुरुष आहेत त्यांचें दर्शन घ्यावें.'

पुष्कळ दिवसांची वाडीला येण्याची इच्छा पूर्ण झाली. तेथें श्रीदत्तपादुकांचें दर्शन घेतांच शास्त्रीबुवांना अतिशय आनंद झाला. शास्त्रीबुवांचा वेष इतका साधा होता कीं तेथील पुजाऱ्यांनीं त्यांना पादुकांवर पाणीहि घालूं दिलें नाहीं. पण दृष्टान्तांत सांगितलेले श्रीगोविंदस्वामी त्याचवेळीं अचानक तेथें आले व त्यांच्या सांगण्यावरून पुजाऱ्यांनीं शास्त्रीबुवांना पादुकांवर पाणी घालूं दिलें! वाडीस एक महिना मुक्काम झाला, त्या अवधींत एकदां दृष्टान्तांत आज्ञा झाल्याप्रमाणें मिरजेचे शंकरभटजी यांच्याकडून श्रीगुरुचरित्राची पोथी आणून शास्त्रीबुवांनीं गुरुचरित्राचा एक सप्ताह केला.

3329



वाडीला रात्रीं शेजारती झाल्यावर देवळाजवळ खालीं कोणीं जावयाचें नाहीं असा नियम आहे. शास्त्रीबुवांना हें ठाऊक नसल्यामुळें एका रात्रीं कृष्णेवर हातपाय धुवून, ते देवाचें दार बंद असल्यामुळें प्रदक्षिणा करण्यास निघाले. दक्षिण दरवाजापाशीं एका भव्य तेजःपुंज संन्यासी पुरुषानें स्वामींना दरडावून विचारलें, “ शेजारती झाल्यानंतर इकडे न येण्याचा नियम तुला माहीत नाहीं काय ?” त्यावेळीं शास्त्रीबुवांनीं नमस्कार करून त्या पुरुषाची क्षमा मागितली, व आपण येथें नवीनच आलेलें असल्यामुळें हा अपराध घडला असें ते म्हणाले. पुढें श्रीगोविंदस्वामींकडून शास्त्रीबुवांना कळलें कीं, तो भव्य तेजःपुंज संन्यासी म्हणजे प्रत्यक्ष श्रीनृसिंहसरस्वती दत्तमहाराजच होते ! शास्त्रीबुवांना झालेलें श्रीदत्तप्रभूंचें पहिलें दर्शन हें असें होतें !

श्रीगोविंदस्वामी हे परमार्थांतील मोठे अधिकारी पुरुष होते. त्यांनींच प्रथम शास्त्रीबुवांना दत्तपादुकांची पूजा करण्यास सांगितलें, पण शास्त्रीबुवांनी तें मानलें नाहीं. परंतु पुढें देवांनींच दृष्टान्तांत सांगितल्यावरून ते दत्तपादुकांची पूजा नियमानें करूं लागले. कांहीं दिवस देवांच्या आज्ञेवरून शास्त्रीबुवांनीं पार्थीवपूजाहि केली.

वाडीहून शास्त्रीबुवा घरीं परत गेले आणि नंतर घरच्या कटकटींनीं त्रासून त्यांनीं एकदां आईला (आईचें नांव रमाबाई होतें) सांगितलें कीं, “ या घरांत कोणी नांदणार नाहीं. येथें धर्मशाळा होईल.” अशा रीतीनें संसाराबद्दल मन अत्यंत उदासीन झाल्यामुळें ते ईश्वरप्राप्तीकडे वळले. स्वतःचें पाप नाहींसें व्हावें म्हणून त्यांनीं चांद्रायणव्रत करण्यास प्रारंभ केला. व्रत शेवटास गेलें तर ईश्वराची कृपा होईल, आणि मध्येंच मरण आलें तर आपला देह

ईश्वराला अर्पण होऊन संसाराचा तापहि चुकेल असा हें व्रत करण्यांत त्यांचा दुहेरी हेतु होता. शुद्ध प्रतिपदेपासून रोज एक एक घांसानें वाढवीत पौर्णिमेला पंधरा घांस जेवावयाचें; आणि वद्य प्रतिपदेपासून एक एक घांस कमी करीत अमावास्ये-पर्यंत जावयाचें व शेवटीं उपास करावयाचा असें हें चांद्रायणव्रत असतें. त्रिकाळस्नान, मौन, इत्यादि आणखी कांहीं नियमहि शास्त्रीबुवा कसोशीनें पाळीत होते. आणि व्रत चालू असतांना आपण मेलों तरी आपल्या तोंडांत अन्न वगैरे घालूं नका असें त्यांनीं आपल्या आईला बजाविलें होतें. ईश्वरकृपनें हें व्रत पूर्ण झालें, पण नंतर अतिशय अशक्तता येऊन रक्त पडणें, ताप येणें इत्यादि विकार सुरू झाले. तशा स्थितींतच आईबरोबर दुसऱ्या वेळीं शास्त्रीबुवा वाडीला गेले, व तेथें यावेळीं त्यांचा तीन चार महिने मुक्काम झाला.

या मुक्कामांत स्वत: दत्तमहाराजांनीं शास्त्रीबुवांना स्वप्नांत मंत्रोपदेश दिला, व श्रीगोविंदस्वामींनीं या मंत्राचा जप कसा करावयाचा त्याची माहिती दिली. शास्त्रीबुवांचे मनांत संन्यास घेण्याचा विचार आला, पण श्रीमौनीस्वामी या सत्पुरुषांनीं "इतक्यांत संन्यासाची गडबड नको" असें त्यांना सांगितलें. त्या-नंतर 'आपण सात वर्षे माणगांवांत रहाणार आहोंत' असें देवांनीं शास्त्रीबुवांना सांगितल्यामुळें ते परत माणगांवीं जाण्या-करितां निघाले. वाटेंत कागल येथील बाजारपेठेंत तिथल्या एका मूर्तिकारानें त्यांना पितळेची एक सुंदर दत्तमूर्ति करून दिली. ही दोन हातांची, अभय देणारी, सिद्धासन घातलेली आणि सात बोटें उंचीची अशी मूर्ति घेऊन शास्त्रीबुवा घरीं परत आले.

लवकरच एका बाईनीं त्यांना पडलेल्या स्वप्नावरून देऊळ

बांधण्याकरितां आपली जागा शास्त्रीबुवांना दिली. नंतर इतर लोकांनीं निरनिराळ्या प्रकारची मदत दिल्यानें सात दिवसांत देवळाचें काम पुरें झालें. शके १८०५ मध्यें वैशाख शुद्ध पंचमीला शास्त्रीबुवांनीं तेथें दत्तमूर्तीची स्थापना केली. यापुढें 'बुवा' देवळांत राहूनच नित्याचें अनुष्ठान चालवूं लागले. पहिल्या गुरुद्वादशीचा उत्सव झाल्यावर बुवांनीं घरीं जाणें अजिबात बंद केलें. रोज सकाळीं कोरडी भिक्षा मागून आणावी, स्वयंपाक करून नैवेद्य वैश्वदेव करावा, गोग्रास व अतिथी यांसाठीं कांहीं अन्न बाजूला ठेवावें आणि राहिलेला भाग आपण सेवन करावा, असा त्यांचा कार्यक्रम होता. लवकरच प्रत्येक शनिवारीं फार मोठा समारंभ होऊं लागला. या दिवशीं पालखींत उत्सवमूर्ती ठेवून देवळाभोंवतीं तीन प्रदक्षिणा करीत. यावेळीं चार–पांच हजारांपर्यंत यात्रा जमत असे. बुवांची तपश्चर्या आणि तीव्र वैराग्य यामुळें या स्थानाची सगळीकडे प्रसिद्धी झाली आणि लोकांच्या कामना पूर्ण होऊं लागल्यामुळें तेथें लोकांची रीघहि लागून राहिली. पिशाच्चापासून होणारी पीडा या ठिकाणीं तेव्हांच दूर होत असे. श्रीदत्तमहाराजांकडून बुवांना जशा आज्ञा होत त्याप्रमाणेंच तेथील गोष्टी करण्यांत येत. कांहीं संशय आल्यास देवाजवळ प्रार्थना करतांच बुवांना लगेच उत्तर मिळत असे. स्वप्नांत किंवा जागेपणीं निरनिराळ्या प्रकारांनीं बुवांना देवांचा आदेश मिळे व त्याप्रमाणें बुवा वागत असत. सर्व कार्यक्रम आटोपल्यावर बुवा देवळांतच झोंपत असत. या काळांत अन्नपूर्णाबाई दिवसांतून फक्त दोन वेळां देवदर्शनाकरितां देवळांत येत.

एकदां गुरुद्वादशीचे उत्सवांत यात्रेमध्यें देवळाजवळ थोडीशी घाण झाली व त्यामुळें घाण करणाऱ्या लोकांना बुवा रागानें

कांहींतरी बोलले. परंतु देवांना ही गोष्ट न आवडल्यामुळें ते बुवांना म्हणाले, 'किती बोलतोस ! इतकें बोलणें चांगलें नाहीं.' असें सांगितल्यानंतर बुवांनीं एक वर्षपर्यंत पूर्ण मौन पाळलें.

पुढें मराठी गुरुचरित्रावर संस्कृत ग्रंथरचना करावी अशी बुवांना देवांची आज्ञा झाली. त्याप्रमाणें दोन हजार श्लोकांचें संस्कृत गुरुचरित्र त्यांनीं लिहिलें. या लेखनाबाबत बुवांनीं एका भक्ताला असें सांगितलें कीं, "मी लिहिण्यास बसलों कीं एका कागदावर मला जशीं अक्षरें दिसतात तशीं मी लिहून काढतों. या लिहिण्याशीं माझा कांहीं संबंध नाहीं." एकदां आरती चालू असतांनाच बुवांनीं तात्कालिक स्फूर्तीनें एक आरती रचून म्हटली; पुढें ती लिहून काढल्यावर त्या आरतींत चारहि महावाक्यांचा अर्थ आलेला आहे असें दिसून आलें. याच सुमारास योगाभ्यासांत कांहीं अडचण उपस्थित झाली, पण देवांच्या आज्ञेप्रमाणें कापशी गांवांतील एका मोजणीदारानें त्यावर बुवांना उपाय सांगितला. याच मोजणीदारानें कबीर-धर्मदास संवादात्मक असें योगाचें विवरण केलेलें एक हिंदी पुस्तक बुवांना दिलें. त्याचा त्यांना पुष्कळ उपयोग झाला. एकदां ऐन उत्सवांत पाऊस पडूं लागला, तेव्हां पावसाला मोठा नैवेद्य दाखवून, 'पर्जन्यराजा तूं कांहीं वेळ दूर जा' अशी बुवांनीं त्याची प्रार्थना केली. त्यावेळीं आसपास खूप पाऊस कोसळला पण उत्सवाचा कार्यक्रम संपेपर्यंत तेथें पावसाचा थेंब सुद्धां पडला नाहीं !

बुवांचा केवळ धार्मिक आचारच नव्हे तर व्यवहारांतील साध्या गोष्टीसुद्धां देवाच्या आज्ञेप्रमाणेंच चालत; त्यांत कोठेंहि चूक झाल्यास त्यावद्दल तत्काल शिक्षा होत असे. आधींच बुवा अत्यंत आचारसंपन्न आणि साधुवृत्तीचे होते; आणि त्यांतहि

त्यांना श्रीदत्तप्रभूंचें सान्निध्य हरघडीं लाभूं लागल्यामुळें शास्त्री-बुवांच्या जीवनास एखाद्या थोर पुराणकालीन ऋषीच्या जीवनाची उंची आणि तेजस्विता प्राप्त झाली. वर जे कांहीं चमत्कार वर्णिले आहेत, ते एखाद्यास प्रथमदर्शनीं अवास्तव वाटण्याचा संभव आहे; परंतु बुवांची दिनचर्या आणि एकंदर आचार व तपश्चर्या ध्यानांत घेतल्यास या चमत्कारांचें रहस्य सहज लक्षांत येऊं शकेल. जसें कारण तसें त्याचें कार्य हा सिद्धान्त ध्यानांत घेतल्यास बुवांच्या जीवनांत हरघडी चमत्कार घडत होते याचा कोणास चमत्कार वाटणार नाहीं. यापुढें तर बुवा हळुहळू श्रीदत्तप्रभूंशीं जणूं काय एकरूप झाले आणि त्यामुळें त्यांचें सर्व जीवनच चमत्कारमय होऊन राहिलें. ज्यांना तपश्चर्येनें ईश्वरी सामर्थ्य प्राप्त होतें त्यांच्या आयुष्यांत अनेक चमत्कार सहजच घडलेले दिसतात. या चमत्कारांपेक्षां सत्पुरुषांच्या आचरणाकडे, वैराग्याकडे आणि ईश्वरभक्तीकडेच आपलें लक्ष प्रामुख्यानें ठेवलें पाहिजे, हें नम्रपणें पण आग्रहानें येथें नमूद करणें जरूर आहे.

सत्पुरुषांच्या महत्त्वाच्या गुणांमध्यें वैराग्याची गणना होते, व या कसोटीला उतरणें हें तलवारीवरून चालण्यासारखें अवघड असतें. बुवांना बाह्यतः दिसावयास मोठें ऐहिक ऐश्वर्य प्राप्त झालें तरी, त्यांच्या घरच्या मंडळींची अन्नवस्त्राची चितासुद्धां दूर झाली नव्हती. कारण बुवा कोणत्याच अर्थानें संसारांत नव्हते. एकदां असा प्रसंग आला कीं बुवांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई यांना नाइला-जानें एका अन्नछत्रांत स्वयंपाक करण्याकरितां पाठविण्याचें ठर-विण्यांत आलें, व घरच्या दारिद्र्याला आणि कटकटीना कंटाळ-लेल्या अन्नपूर्णाबाईनीहि तेथें जावयाचें ठरविलें ! यासंबंधींचा आईचा निरोप बुवांना कळल्यावर बुवा निरोप सांगणाऱ्यास

म्हणाले, "अप्पा, कुटुंबानें असें जाणें तुम्हांला बरें वाटतें काय?" अप्पा म्हणाले, "नाहीं." तेव्हां बुवांनीं सांगितलें, "देवाची प्रार्थना करा म्हणजे जाणें रहीत होईल." अप्पांनीं प्रार्थना केली आणि ते घरीं गेले. अन्नपूर्णाबाईंचे बरोबर जाणाऱ्या माणसाला पहांटे फुरसें (एक सरपटणारा विषारी प्राणी) चावलें आणि अन्नछत्रांत नोकरीकरितां जाण्याचा अन्नपूर्णाबाईंचा बेत अर्थात रहीत झाला.

## माणगांवांतून प्रयाण : ३

* * * * * * * * * * * * * *

माणगांवास बुवांचें वाढतें महत्त्व सहन न झाल्यामुळें त्या ठिकाणच्या एका ब्राह्मणानें बुवांच्यावर मंत्रप्रयोग केला आणि अतिसाराचा उपद्रव त्यांच्या पाठीमागें कायमचा लावून दिला. त्यामुळें बुवांचा योगाभ्यास बंद पडला. यावर देव बुवांना म्हणाले, " आतां योगाभ्यास होणें शक्य नाहीं; तरी आतां गृहस्थाश्रमास आरंभ करावा. " बुवांच्या गृहस्थाश्रमाची ही वार्ता कळल्यावर आईला आनंद वाटला, आणि देवाचे धर्मशाळेंतच बुवा सहकुटुंब राहूं लागले. बुवांचें जेवण देवळांतच होई आणि अन्नपूर्णाबाई जेवणापुरत्या घरीं जात असत. एका रात्रीं बुवांची वाट पहात अन्नपूर्णाबाई देवळाच्या दारांत बसल्या असतां त्यांची आपोआप समाधि लागली ! कांहीं वेळानें बुवांनीं त्यांना सावध केल्यावर त्या म्हणाल्या, " मी पूर्ण आनंदांत होतें; आपण मला उगीच सावध केलेंत." सत्पुरुषाच्या संगतीचा महिमा असा असतो.

पुढें सूनबाईंना दिवस गेले आहेत हें समजल्यावर सासूबाईंनीं (रमाबाई) उग्र रूप धारण केलें व त्या म्हणाल्या कीं, 'बाळंतपणाची व्यवस्था ज्याची त्यांनीं करावी !' या प्रकारानें बुवांना अतिशय वाईट वाटलें. इतक्यांत अकस्मात एके दिवशीं 'आज माणगांव सोडून निघून जावयाचें आहे,' असें देवांनीं

बुवांना सागितलें, व देव आणि कुटुंब बरोबर घेऊन निघण्याची आज्ञा केली. आईला वंदन करून आपला माणगांव सोडून जाण्याचा बेत बुवांनीं तिला सांगितला. त्या वेळींहि आईनें रागावून सुनेला वाईट साईट बोलून घेतलें. मंगळसूत्राशिवाय नथ वगैरे जे किरकोळ दागिने होते ते काढून ठेवून अन्नपूर्णाबाईहि बुवांच्या-बरोबर लगेच निघाल्या. बुवांनीं दोन मूर्ति, पंचायतनाचा संपुष्ट आणि एक तांब्या एवढेंच सामान बरोबर घेऊन, व "आपलें येथें कांहीं नाहीं" असें पोंचविण्यास जमलेल्या मंडळींना सांगून माण-गांव सोडलें ! शके १८११ च्या पौषमासांत बुवांनीं माणगांव सोडलें; यावेळीं बुवांचें वय पसतीस वर्षांचें होतें. यानंतर पुन्हां कधींहि या भागांत बुवांचें येणें झालें नाहीं.

माणगांवाहून सावंतवाडीला येऊन तेथून बुवा सहकुटुंब नरसोबाचे वाडीस येऊन पोंचले. लवकरच अन्नपूर्णाबाई प्रसूत होऊन त्यांना मुलगा झाला, पण दुर्दैवानें तो लगेच मरण पावला. पुढें बुवा सहकुटुंब ब्रह्मानंदाचे माडीवर राहूं लागले. रोज कोरान्न भिक्षा मागावी, तांब्यांत तांदूळ व वस्त्रांत जोंधळे घ्यावेत अशी बुवांची रीत होती. वाडीस याप्रमाणें एक वर्षपर्यंत बुवांचा गृहस्थाश्रम चालू होता.

वाडीस आल्यावर कांहीं दिवसांनीं गोविंदस्वामींचा समाधिकाल जवळ आला, तेव्हां त्यांनीं बुवांना बोलावून दशोप-निषदें सांगितलीं, आणि उपनिषदाच्या पोथ्या आणि एक शाळिग्राम त्यांना दिला. नंतर स्वामींनीं मननांतील शास्त्रीय रहस्य बुवांना समजावून दिलें व पूर्ण आशीर्वाद दिला. तेव्हां बुवांनीहि त्यांना गुरु समजून साष्टांग नमस्कार घातला लवकरच गोविंदस्वामी समाधिस्त झाले व त्यांचा समाराधनाविधि बुवांच्या हस्तेंच झाला.

3329

वाडीस येऊन एक वर्ष होतांच उत्तर दिशेस जाण्याबद्दल बुवांना देवांची आज्ञा झाली, तेव्हां ते कुटुंबाला बरोबर घेऊन तावडतोब वाडी सोडून निघाले. कोल्हापूर, भिलवडी, औदुंबर, पंढरपूर, बार्शी असे मुक्काम करीत बुवा गोदावरीचे तीरावर गंगाखेड येथें येऊन पोंचले. तेथें एके दिवशीं बुवांना दृष्टान्त झाला कीं, 'आजपासून चवथ्या दिवशीं तुम्हांला दोघांनाहि नेण्याकरितां आम्ही येऊं.' त्यावर बुवा म्हणाले, 'मला संन्यास घ्यावयाचा असल्यानें मी येणार नाहीं. तिला वाटल्यास न्या, माझी हरकत नाहीं.' यानंतर अन्नपूर्णाबाई आजारी पडल्या, आणि त्यांना महामारी सुरू झाली. त्याच आजारांत शके १८१३, वैशाख वद्य चतुर्दशी, शुक्रवारीं अन्नपूर्णाबाईंनीं आपली जीवन-यात्रा संपविली. त्यावेळीं लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे. 'गंगाखेड: श्रींचे आज्ञेनें उत्तरखंडीं जाणें होत असतां गोदावरीतीरीं ..... सौभाग्यवतीला देवाज्ञा झाली. क्रिया करून नंतर उत्तरपंथीं जाणें होईल......इहपरभयानें सत्कालक्षेप करावा. मातोश्री आईस मानसिक वंदन असावें. यावर आतां भेट होणें प्रारब्धाधीन आहे. ........'.

अन्नपूर्णाबाईच्या मृत्यूनंतर सहावे दिवशीं तांबडें वस्त्र नेसलेली विधवा बाई बुवांचे स्वप्नांत आली व त्यांच्या गुडघ्यांच्या-वर घट्ट धरून ती बुवांना म्हणाली, 'मी तुम्हांला घेऊन जाणार.' बुवा जागे झाले व स्वप्नाचा अर्थ लक्षांत येऊन त्यांना फार वाईट वाटलें. ते म्हणाले, "आजपर्यंत तीन वेळां संन्यासाची इच्छा व्यक्त केली असतां ती देवानें पुरी होऊं दिली नाहीं ..... देवानें अशा वेळीं उपेक्षा करून आपला घात करणें चांगलें आहे काय ? .... काहीं झालें तरी संन्यास घेतल्यावांचून आपण देह ठेवणार नाहीं." यानंतर येऊं पहाणारा बुवांचा अपमृत्यु टळला आणि बुवांचा संन्यासाचा हट्ट देवांनीं लवकरच पुरविला.

✤ ✤ ✤

## 'महाराज' पदाची प्राप्ति : ४
* * * * * * * * * * * * * * *

गंगाखेड येथें अन्नपूर्णाबाई वारल्यानंतर तेरा दिवसपर्यंत त्यांच्यासंबंधींचे सर्व विधि करून चवदाव्या दिवशीं बुवांनीं संन्यासाश्रम घेतला. त्याच दिवशीं रात्रीं श्रीगोविंदस्वामींच्या रूपानें श्रीदत्तप्रभूंनीं बुवांना प्रणवाचा उपदेश करून, त्याचाच जप करण्यास सांगितलें. 'यापुढें माधुकरीचेंच अन्न घ्यावें, मठ-भिक्षा नको' असेंहि त्याचवेळीं देवांनीं बुवांना सांगितलें. दुसऱ्या दिवशीं गोदावरीचे तीरावर नदीपलीकडून अकस्मात एक संन्यासी तेथें आले आणि बुवांच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं बुवांना प्रेषोच्चार दिला.

आतां बुवांना 'महाराज' असें म्हणणें योग्य होईल.

'उज्जयिनी येथें नारायणानंद सरस्वती नांवाचे स्वामी आहेत, त्यांच्याकडे जाऊन दंड घ्यावा' अशी महाराजांना प्रभूंची आज्ञा झाल्यामुळें गंगाखेड सोडून महाराज वाशीम, उमरखेड, माहूर, खांडवा, ओंकारेश्वर इत्यादि गांवांवरून मंडलेश्वरीं आले. तेथें रहाणारे श्रीकैवल्याश्रमस्वामी यांनीं महाराजांना दंड देण्याची तयारी दाखविली, परंतु देवांनीं आपल्या आज्ञेची पुन्हां आठवण दिल्यामुळें त्या स्वामींकडून दंड न घेतां महाराज पुढें निघाले, व बलवाडयावरून उज्जयनीस येऊन पोंचले.

उज्जयनी येथें नारायणस्वामींनीं आपल्या गुरूंच्या अनुज्ञेनें महाराजांना दंड दिला आणि त्यांचें नांव 'वासुदेवानंद सरस्वती' असें ठेवलें. ही गोष्ट शके १८१३ (इ.स. १८९२) मध्यें घडली.

संन्यास घेतल्यावर श्रीवासुदेवानंद सरस्वतींची साधना किंवा अभ्यास एका तऱ्हेनें समाप्त झाला, आणि ते गुरुपदावर अधिष्ठित होऊन आपल्या आयुष्यांतील मुख्य कार्याला सिद्ध झाले. दंडग्रहण झाल्यानंतर श्रीदत्तप्रभूंची महाराजांना पुढीलप्रमाणें आज्ञा झाली :

**'सर्वत्र वर्णाश्रमलोप झालेला आहे. तरी सर्व भरतखंडांत पायींच संचार करून सर्व लोकांना उपदेश करावा व धर्ममार्गाची स्थापना करावी.'**

श्रीप्रभूंची आज्ञा शिरसावंद्य मानून यानंतर सुमारें तेवीस वर्षें महाराजांनीं भरतखंडांत पायीं हिंडून, काया–वाचा–मनें करून लोकांना उपदेश देण्याचें व धर्ममार्गाची स्थापना करण्याचें काम निरलसपणें केलें. महाराजांची दिनचर्या अत्यंत कडक शिस्तीची होती व 'आधीं केलें मग सांगितलें' असेंच महाराजांचें आचरण असल्यानें, त्यांच्या आदर्श चारित्र्याची छाप लोकांवर तत्काळ पडत असे. इंग्रज राज्यकर्त्यांच्या ऐहिक ऐश्वर्यानें दिपून गेलेल्या भारतीयांसमोर श्रीप्रभूंनीं महाराजांच्या रूपानें आर्य संस्कृतीचा एक थोर आदर्श मुद्दामच उभा केला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पहांटे उठून प्रातर्विधि झाल्यावरोबर स्नान करावें, नंतर दत्तमूर्तीस स्नान घालून भस्म लावावें, नंतर कोणी येतील त्यांस वेद–शास्त्र इत्यादींचे पाठ द्यावेत, दुपारीं स्नानादि नित्यकर्म झाल्यावर फक्त तीनच दक्षिणी ब्राह्मणांच्या घरीं भिक्षा मागावी, व मिळालेलें सर्व अन्न एकत्र करून खावें. दुपारीं पुन्हां कांहीं

शास्त्रीय विषय शिकवावा, व सायंकाळच्या स्नान–अनुष्ठानानंतर पुराण सांगावें. अशी साधारणतः महाराजांची दिनचर्या होती. पुराणांत ते वेद-वाक्यांचा फक्त अर्थ सांगत; कारण पुराणांत व कीर्तनांत वेदवाक्यांचा उच्चार करूं नये असें महाराजांचें सांगणें असे.

महाराजांचें वैराग्यहि धगधगीत असल्यानें त्यांना संग्रह ही गोष्ट ठाऊकच नव्हती. चार लंगोटया, दोन छाटया, दंड व कमंडलू, क्वचित् धावळी, उपनिषदांची पोथी, पंचायतनाचा संपुष्ट, दोन दत्तमूर्ति व पाणी काढण्याची दोरी इतकेंच सामान महाराजांच्या बरोबर असे. वस्त्रें धुण्याची इत्यादि सेवा कोणाकडूनहि घ्यावयाची नाहीं, कोणालाहि स्पर्श करावयाचा नाहीं, तसा स्पर्श झाल्यास किंवा शौचास जाऊन आल्यास लगेच स्नान करावयाचें, सर्व प्रवास पायीं आणि अनवाणीच करावयाचा, सर्व सिद्धी प्रसन्न असतांहि त्यांचा उपयोग कधींच करावयाचा नाहीं व धर्ममार्गानें सदैव लोकांचें इहपर कल्याण साधीत रहावयाचें. असें हें महाराजांचें दिव्य आचरण पाहून जाणत्या धार्मिक लोकांना आनंदाचें भरतें येत असेल, व या धर्मभ्रष्टतेच्या काळांत हा कोणी ब्रह्मनिष्ठ पुरातन ब्रह्मर्षिच भारतांत पुन्हां अवतारला कीं काय असें वाटून तें अत्यंत आनंदानें स्तिमित होत असतील !

उज्जैनीचा चातुर्मास संपतांच महतपुराहून महाराज सारंगपूर या गांवीं आले. तेथील नास्तिक देवी-डॉक्टराला महाराजांनीं स्वतः संध्या, पूजा, वैश्वदेव इत्यादि ब्रह्मकर्म शिकविलें आणि त्याला सन्मार्गाला लाविलें. सारंगपुराहून निघाल्यानंतर वाटेंत फार पाऊस पडल्यानें ते एका अग्निहोत्री बुवांच्या घराच्या पुढील ओटयावर उतरले. पण बुवांच्या मुलानें हांकून लावल्यानें महाराज गांवाबाहेर जाऊन रात्रभर एका झाडाखालीं राहिले. इकडे

अग्निहोत्री बुवांच्या मुलाला एकाएकीं वेड लागल्यामुळें ते महाराजांचे शोधार्थ निघाले. दीड वर्षानें महाराजांची गांठ पडल्यावर बुवांनीं त्यांची क्षमा मागितली व मुलाला बरें करण्याबद्दल विनंती केली. महाराजांनीं त्याला गृहस्थाचा अतिथीधर्म समजावून दिला व अंगारा देऊन त्याचे मुलाला बरें केलें.

त्यानंतर पिछोरा, खरेरा, या गांवांवरून महाराज काशीला जावयास निघाले. महाराज एका जंगलांतील पायवाटेनें चालले होते. वाटेंत श्रीदत्त भिल्लवेषानें महाराजांचे जवळ आले व त्यांनीं महाराजांना एका गांवाजवळ आणून सोडलें. ज्या गांवीं येण्यास दोन-तीन दिवस लागावयाचे तेथें आपण एक-दोन तासांतच आलों हें महाराजांना कळून येतांच त्यांना प्रभूंच्या अतर्क्य लीलेचें कौतुक वाटलें. तेथून पुढें महाराज जालवण मुक्कामीं आले व तेथें कांहीं दिवस त्यांनीं मुक्काम केला. तेथील एक शास्त्री संस्कृताचे फार अभिमानी असून प्राकृत भाषांना तुच्छ लेखीत. दास-नवमीच्या दिवशीं महाराजांनीं 'दासबोधां'तील एका ओवीवर प्रवचन करून त्या ओवीचा एका वेदवाक्याशीं मेळ घालून दाखविला, तेव्हां शास्त्रीबुवा मनांत उमजले व साधुपुरुषांनीं केलेल्या प्रासादिक प्राकृत ग्रंथांचें महत्त्व मोठें आहे हें महाराजांचें म्हणणें त्यांना पटलें. पुढें महाराजांचे सांगण्यावरून गुरुचरित्राचा सप्ताह केल्यावर शास्त्रीबुवांच्या घरांतील ब्रह्मसमंधाची पीडाहि नाहींशी झाली.

जालवणाहून महाराज ब्रह्मावर्तास येऊन पोंचले, व या वेळीं ते सुमारें दीड वर्षे तेथें राहिले. प्रथम आठ महिने महाराजांनीं एका झोंपडींत राहून तपश्चर्या केली व पुढें चातुर्मासांत पुराण सांगितलें. ज्योतिष, वेदान्त, योग इत्यादि गहन विषयांतील

महाराजांचें अलौकिक ज्ञान व शिक्षणाकरितां सदैव मुक्तद्वार यामुळें महाराजांचा कीर्तिपरिमल जिकडे-तिकडे पसरला व ठिकठिकाणचे मोठमोठे लोक दर्शनाकरितां ब्रह्मावर्तास येऊं लागले. येथें असतां-नाच गंगातीरावर महाराजांनीं "दत्तपुराण" नांवाचा साडेतीन हजार श्लोकांचा एक संस्कृत ग्रंथ लिहिला.

ब्रह्मावर्ताहून निघून गोकुळ, मथुरा, वृंदावन वगैरे स्थानां-वरून शके १८१५ च्या वैशाखी पौर्णिमेस महाराज हरिद्वारास आले व तेथें दत्तमंदिरांत त्यांनीं मुक्काम केला. त्या वेळीं तेथें असलेले शारदापीठाधीश श्रीशंकराचार्य यांना चातुर्मासांत महाराजांनीं उपनिषद्भाष्य ऐकविलें, व चार्तुमास संपल्याबरोबर *(भाद्रपद शु. पौर्णिमेनंतर) महाराज बद्रीनारायणाच्या यात्रेकरितां निघाले.

हृषीकेश, रुद्रप्रयाग इत्यादि स्थानें पहात पहात प्रवास करीत असतां एका तुटलेल्या कड्याजवळ पुढें रस्ता नसल्यानें महाराज थबकले. इतक्यांत त्या कड्यावरून दोघे पुरुष खालीं येऊन महाराजांना म्हणाले, "पुढें जाण्यास रस्ता नाहीं. मागें परत जा. नाहींतर देहपात होईल." त्यावर महाराज म्हणाले, "देह पडला तरी हरकत नाहीं. नरनारायणांचे दर्शनाकरितां आलों आहें; तें दर्शन झाल्याशिवाय मी परत फिरणार नाहीं." महाराजांचा हा निर्धार पहातांच ते दोघे पुरुष अदृश्य होऊन त्या ठिकाणीं प्रत्यक्ष नरनारायणमुनि दिसूं लागले. महाराजांनाहि नर-नारायणांचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यामुळें अतिशय आनंद झाला. पुढें महाराजांनीं बद्रिनारायणाच्या मूर्तीचें जवळ जाऊन दर्शन व पूजन केलें. हिमालयांतील या यात्रा करावयाच्या

---

* संन्याशाचा चातुर्मास भाद्रपदी पौर्णिमेस संपतो.

म्हणजे थंडी आणि बर्फ यांच्या माऱ्यानें यात्रेकरूंचे फार हाल होतात. तथापि महाराजांनीं दोन छाटचा व एक धाबळी एवढचा तीन वस्त्रांवर सर्व यात्रा पार पाडली! गंगोत्री येथें स्नान करतांच भयंकर थंडीनें महाराजांची हालचाल बंद पडली. त्या वेळीं कोणी-तरी आणून ठेवलेल्या शेगडीजवळ बसून महाराजांनीं थोडा वेळ शेक घेतला. अग्निस्पर्श करूं नये अशी महाराजांना प्रभूंची आज्ञा होती, त्याविरुद्ध वागण्याचा हा एकच प्रसंग महाराजांचे चरित्रांत केवळ नाइलाजानें घडलेला आहे! शके १८१६ व १८१७ हे महाराजांचे दोन चातुर्मास हिमालयांत अज्ञातवासांत कोठें-तरी झाले.

** ** **

## सृष्टीची काळजी ईश्वराला : ५

* * * * * * * * * * * * * * * *

हिमालयांतील यात्रा आटोपून शके १८१८ चे वैशाखी पौर्णिमेस महाराज हरिद्वार येथें परत आले. या वर्षीचा चातुर्मास तेथेंच झाला. येथून पुढें ब्रह्मावर्तास जातांना भिक्षेची सोय नसल्यामुळें महाराजांना अठरा दिवस उपवास पडला. कधीं फळें तर कधीं गव्हाचें भाजलेलें पीठ एवढ्या आहारावर महाराज रोज सुमारें ४० ते ५० मैलांची मजल मारीत असत. ब्रह्मावर्तास एका बाईचा नवरा बाटून मुसलमान झाला होता, व तो आपल्या बायकोला घेऊन जाण्याकरितां तेथें आला होता. त्याच्याबरोबर जावें कीं नाहीं असें त्या बाईनें विचारतांच "पति प्रायश्चित्त घेऊन शुध्द झाल्यावांचून त्याच्याशीं संसर्ग ठेवूं नये असें शास्त्र आहे," अशी महाराजांची आज्ञा झाली. त्यामुळें त्या बाईनेंहि नवऱ्याबरोबर न जातां ब्रह्मावर्तासच राहून हरिभजनांत काळ घालविला.

प्रयाग क्षेत्रांत भरणाऱ्या एका धर्मशास्त्र-परिषदेकरितां इंदूरच्या महाराजांचे प्रतिनिधी म्हणून निघालेले पंडित सखाराम-शास्त्री टिल्लू महाराजांना भेटावयास आले असतां महाराज म्हणाले,

**"शास्त्रीबुवा ! भगवंतापासून निःश्वासवत् सर्वज्ञानकर अपौरुषेय वेद आविर्भूत झाले व सर्व सृष्टीहि ईश्वरानेंच**

**केली. सव जगताचा व्यवहार चालविण्याकरितां मोठमोठ्या मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं अनेक स्मृति-पुराणें करून त्यांतून सर्व नियम सांगितले आहेत. त्यांत केव्हांहि बदल करतां यणार नाहीं. . . . . आपण निर्माण केलेल्या सृष्टीची काळजी त्या ईश्वराला नाहीं आणि ती तुमच्यासारख्यांना मात्र आहे असें म्हणतां येणार नाही."**

गंगातीरीं ब्रह्मावर्त येथें महाराजांचा मुक्काम असतांना एका अनधिकारी माणसानें महाराजांना न कळत त्यांचें तीर्थ घेतल्यानें दुसऱ्या दिवशीं त्यांच्या सर्वांगावर फोड उठले. " तीन दिवस नर्मदेचें स्नान केल्यावर शरीर पूर्ववत् चांगलें होईल," असा दृष्टान्त झाल्यामुळें तेथून निघून महाराज कांहीं दिवसांनीं नर्मदातीरीं नेमावर येथें येऊन पोंचले. तीन दिवसांत नर्मदा-मातेच्या स्नानानें तो रोग बरा होऊन महाराजांचें शरीर पूर्वीप्रमाणें चांगलें झालें. त्या वेळीं महाराजांनीं 'नर्मदालहरी' या स्तोत्रानें नर्मदेची स्तुति केली.

ब्रह्माणी घाटावर पाय घसरून महाराजांचे कमरेंत लचक भरली. त्या वेळीं नर्मदामातेनें कुमारिकेच्या रूपानें येऊन थोडेंसें भस्म मंत्रून तें महाराजांचे कमरेला चोळलें, व तिच्या सांगण्या-प्रमाणें महाराजांनीं आपला पाय खालीं ठोकतांच, त्यांना उत्तम चालतां येऊं लागलें. तेथून नेमावर, उज्जयनी वगैरे गांवीं फिरत फिरत महाराज नर्मदाकिनारीं ओंकारेश्वर या प्रसिद्ध ज्योति-र्लिंगाच्या क्षेत्रांत आले.

तेथें कांहीं दिवस राहून मंडलेश्वर, महेश्वर इत्यादि गांवां-वरून इंदूर संस्थानांतील मही नदीच्या तीरावरील पेटलाद या गांवीं महाराज येऊन पोंचले. या गांवीं आषाढ शुद्ध पक्षांत

'दत्तलीलामृतसिंधु' हा प्राकृत एक हजार ओव्यांचा ग्रंथ महाराजांनीं लिहिला. याच ठिकाणीं महाराजांचा शके १८१९ चा चातुर्मास झाला. पेटलादहून निघाल्यावर महाराज चिखलदा गांवीं आले. या ठिकाणीं देवाभक्तांमधील प्रेमाच्या भांडणाचा एक मजेदार प्रसंग घडला. महाराजांच्या बरोबर असलेल्या दत्तमूर्तीला रोज गार पाण्याचें स्नान व भस्म एवढेच उपचार असत. दिवाळीच्या दिवशीं दुपारीं भिक्षा मागून आणल्यावर महाराज मूर्तीजवळ गेले, तेव्हां प्रभू एकदम रागावून म्हणाले, " आज दिवाळी असून मला मंगलस्नान घातल्याशिवाय नैवेद्य दाखवितोस काय ? मी इकडे नर्मदेंत बसलों आहें. मला नैवेद्य नको, कांहीं नको ! " प्रभूंचे हे शब्द ऐकून महाराज घाबरले व नर्मदेच्या तीरावर आले. इतक्यांत लहान मुलाच्या रडण्याचा आवाज पाण्यांतून ऐकूं आला. त्या आवाजाच्या अनुरोधानें महाराज पाण्यांत शिरले असतां एका ठिकाणीं उत्तम प्रकाश दिसला. त्याबरोबर महाराजांनीं बुडी मारून ती मूर्ति प्रेमानें हातांत घेतली आणि ते वर आले ! त्या वेळीं तेथें जमलेल्या मंडळींना ही घटना समजतांच त्यांनीं मंगलस्नानाचें सर्व साहित्य जमा केलें आणि महाराजांनीं अत्यंत प्रेमार्द्र चित्तानें दत्तमूर्तीची महापूजा केली.

चिखलदा येथील भाविक मंडळींना महाराजांनीं केलेला उपदेश महत्त्वाचा आहे. " सगुण परमेश्वराची उपासना करून मनुष्यानें कृतार्थ व्हावें. सगुण उपासना केल्यावांचून ब्रह्मसाक्षात्कार होणार नाहीं. राजाला जसा आपल्या शिक्कामोर्तबाचा आणि कायद्याचा अभिमान असतो तसाच देवाला आपल्या सगुणरूपाचा व वेदशास्त्रांचा अभिमान आहे. . . . . शास्त्राज्ञेप्रमाणें वागून ईश्वराची सेवा करा व आपलें कल्याण करून घ्या. "

चिखलद्याहून निघून वैशाख शुद्ध दशमीला महाराज तिलकवाडा येथें येऊन पोंचले. नर्मदातीरावरील या गांवच्या मारुती-मंदिरांत महाराजांचा शके १८२० चा चातुर्मास झाला. तिलकवाड्याहून निघाल्यावर महाराज फिरत फिरत शिनोर या गांवीं येऊन पोंचले. येथील एक गोष्ट सांगण्यासारखी आहे.

शिनोरास रामशास्त्री या नांवाचे गृहस्थ वेदाध्ययनाकरितां आपल्या मामाकडे रहात असत. रामशास्त्री यांचे वडील बडोदें येथें होते. शास्त्रीबुवांच्या १८ व्या वर्षीं वडील प्लेगनें वारले तेव्हां त्यांना फार दुःख झालें व त्यांनीं घरांतून कोठेंतरी निघून जाण्याचा विचार केला. त्या रात्रीं रामशास्त्री यांचे स्वप्नांत एक संन्यासी आले आणि त्यांना म्हणाले, " तुझ्या जाण्यानें आईला किती दुःख होईल हा विचार तूं केला आहेस काय ? कर्दमऋषि वनांत निघून गेले, तरी कपिलमुनि आपल्या मातेला सोडून न जातां त्यांनीं तिला अध्यात्म-उपदेश करून शोकरहित केलें."

यावर रामशास्त्र्यांनीं विचारलें, "अध्यात्म म्हणजे काय ?"

स्वामींनीं उत्तर दिलें, " जीवब्रह्मांचें ऐक्यप्रतिपादन हेंच अध्यात्म."

रामशास्त्र्यांनीं प्रश्न केला, " तें मला कसें समजेल ?"

त्यावर स्वामी उत्तरले, " एक वर्षानंतर हें सर्व तुला कळेल."

हा संवाद स्वप्नांत संस्कृतांतच झाला होता. या स्वप्नानंतर सुमारें एक वर्षानें रामशास्त्र्यांना उपदेश करण्याबद्दल देवांचें सांगणें झाल्यावरून, वर सांगितल्याप्रमाणें महाराज शिनोरास येऊन पोंचले. एक संन्यासी गांवांत आल्याचें कळतांच रामशास्त्री महाराजांना भेटण्यास आले. तरुण वय असल्यामुळें रामशास्त्र्यांना

साहजिकच थोडासा ताठा होता, त्यामुळें महाराजांशीं ते उध्दटपणें वागले. त्यावर महाराजहि रागावून बोलल्यामुळें रामशास्त्री घरीं चालते झाले. पुढें तेथील एका बहुश्रुत बाईनीं फार आग्रह केल्यामुळें रामचंद्रशास्त्री पुन्हां महाराजांकडे आले. कांहीं प्रश्नोत्तरें झाल्यावर महाराजांनीं 'जन्माद्यस्य यतोन्वयात्' हा श्लोक सांगण्यास शास्त्रीबुवांना सांगितलें. त्यावर रामशास्त्री म्हणाले, "मला अशा वेदान्तपर श्लोकाचें विवेचन करतां येत नसल्यामुळें ते श्लोक कसेतरी सांगतों." तेव्हां महाराज म्हणाले, "अरे ! मुख्य जर समजलें नाहीं तर भागवत-वाचनाचा उपयोग काय ?" हें ऐकल्याबरोबर रामशास्त्री अर्थातच रागावले. तरीहि महाराज शांतपणें पुढें म्हणाले, "मात्रे अध्यात्मनिवेदनं । किं तदध्यात्मं । जीवब्रह्मणोरैक्यप्रतिपादनं । तदहं कथं विजानीयाम् । यावत्पूर्णो न वत्सर : ।"

हीं वाक्यें महाराजांच्या मुखांतून बाहेर पडतांच एकदम एक वर्षापूर्वीं पडलेल्या स्वप्नाची रामशास्त्र्यांना आठवण झाली. लगेच सर्व राग शांत होऊन रामशास्त्र्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले आणि महाराजांच्या पुढें येऊन त्यांनीं एकदम साष्टांग नमस्कार घातला. स्वप्नांत पाहिलेली मूर्ती ती हीच असें लक्षांत येतांच एकदम सर्व वातावरण बदलून गेलें व शास्त्रीबुवा महाराजांचे शिष्य झाले. तेथें असेपर्यंत 'पंचदशी' आणि 'भागवत' यांतील कांहीं भाग महाराजांनीं शास्त्रीबुवांना शिकविला. हें अध्ययन चालू असतांनाच एके दिवशीं कोणासहि न सांगतां महाराज तेथून निघून गेले.

शिनोरास असतांनाच महाराजांचे प्रसिद्ध शिष्य श्रीगांडाबुवा यांना महाराजांचें पहिल्यांदा दर्शन झालें. महाराजांनीं त्यांना नंतर

निकोदा या गांवीं एका शिवालयांत रहाण्यास सांगितलें व म्हणाले, " तूं येथें शंकरांसमोर योगाभ्यास कर. श्रद्धेप्रमाणें शंकर परमात्मा तुला फळ देतील."

तेथून महाराज गिरनार पर्वतावर गेले, आणि तेथून प्रभासपट्टण येथें आले. याच ठिकाणीं " द्विसाहस्त्री गुरुचरित्रा " वर महाराजांनीं संस्कृतांत टीका लिहिली. प्रभास क्षेत्राहून निघून महाराज प्राचीसरस्वतीस येऊन पोंचले. श्रीकृष्ण परमात्मा निजधामास गेले तें हेंच ठिकाण. या ठिकाणीं वंदन करून पोरबंदरवरून ज्येष्ठ मासांत महाराज द्वारका येथें येऊन पोंचले. येथेंच शके १८२१ चा चातुर्मास झाला.

द्वारकेंत असतांना " द्विसाहस्त्री गुरुचरित्रा "ची टीका पुरी केली. त्यानंतर राजकोट, विरमगांव, सिद्धपूर, डाकोर या गांवांवरून महाराज शिनोरा येथें आले, व या खेपेस तेथें तीन महिनें मुक्काम झाला. शिनोराहून वैशाखी अमावास्येला महाराज चिखलदा मुक्कामीं आले व नर्मदातीरावरील राममंदिरांत मुक्काम करून, शके १८२२चा चातुर्मास त्यांनीं तेथेंच केला. पुढें महाराज चिखलद्याहून मंडलेश्वर मुक्कामीं आले. याच ठिकाणीं 'कृष्णावेणीपंचगंगायुतिस्थं' हें वाडीवर्णनात्मक स्तोत्र रचून महाराजांनीं वाडीच्या पुजाऱ्यांबरोबर वाडीच्या एका ब्राह्मणासाठीं पाठवून दिलें.

# लेखनबंदीची आज्ञा : ६

* * * * * * * * * * * * * *

मंडलेश्वरीं महाराजांना रोज ताप येऊं लागला, पण स्नानादिक विधि आणि विद्यार्थ्यांना द्यावयाचे पाठ त्यांनीं कधींहि बंद ठेवले नाहींत. औषध तर महाराज कधींच घेत नसत. एकदां मात्रा घेण्याबद्दल एकानें विनंती केली असतां महाराज म्हणाले, " आपणांजवळ त्रिमात्रांचा संग्रह आहे. आतां फक्त अर्धमात्रेचाच प्रश्न आहे. · · · त्यामुळें तुमच्या सगळ्या मात्रेचा कांहीं उपयोग नाहीं." या वाक्यांतील गूढार्थ तज्ज्ञच जाणूं शकतील. एकदां पुर्नविवाहाबद्दल वाद चालू असतांना मंडळींच्या आग्रहावरून पुर्नविवाहाच्या खंडनपर लेख लिहिण्याकरितां महाराजांनीं लेखणी हातांत घेतांच " लेखणी खालीं ठेव " असें देवांचें सांगणें झालें व त्याप्रमाणें महाराजांनीं सर्वच लिहिणें बंद केलें !

याबाबत सुमारें एका वर्षानंतर कांहीं प्रसंगानें देव महाराजांना म्हणाले, " आपण कांहीं इतर लिहिण्यास बंदी केली नव्हती. तो लेख लिहिण्यासच फक्त बंदी होती." हा देवांचा अभिप्राय समजल्यावर पुनः लिहिण्यास आरंभ झाला. महाराजांच्या जीवनांतील प्रत्येक बारीक-सारीक गोष्टीकडे प्रभूंचें किती बारकाईनें लक्ष असे व देवांच्या आदेशाप्रमाणेंच महाराज कसे वागत असत हें यावरून स्पष्ट होतें. ' देव ठेवील तसें रहावें,' ' कर्ता करविता

नारायण, मी केवळ निमित्तमात्र ' अशा तऱ्हेच्या संत-वचनांचा प्रत्यक्ष आचार महाराजांच्या जीवनांत प्रत्यक्ष दिसून येत होता.

मंडलेश्वराहून महाराज इंदुरास आले, व तेथून उज्जनीस गुरुस्वामींची शुश्रूषा करून वैशाख मासांत ते महत्पूर येथें आले. तेथें शके १८२३ चा चातुर्मास होऊन आणखीहि कांहीं महिने मुक्काम झाला. या ठिकाणीं महाराजांनीं दत्तपुराणांतील सर्व कथांचा संग्रह करून ' दत्तमाहात्म्य ' या नांवाचा एक मराठी ओवीबद्ध रसाळ ग्रंथ लिहिला, व तेथेंच ' त्रिशती गुरुचरित्र ' म्हणून ३०० श्लोकांचें एक संस्कृत काव्यहि तयार केलें. महत्पुराहून निघाल्यावर आलोट, सारंगपूर, भेलसा या गांवांवरून महाराज जालवण मुक्कामीं आले. तेथील ब्राह्मणांत पडलेले दोन तट मोडून त्यांची त्यांनीं एकी करून दिली.

जालवणाहून निघून चैत्र शुद्ध त्रयोदशीस महाराज ब्रह्मावर्त क्षेत्रांत येऊन पोंचले. ही येथें येण्याची तिसरी वेळ. शके १८२४, १८२५ व १८२६ हे ओळीनें तीन चातुर्मास येथेंच झाले. ब्रह्मावर्तीं नेहमींप्रमाणें ताक न घेतां त्याऐवजीं पाणी पिण्यांत आल्यानें महाराजांचा संग्रहणीचा विकार बळावला, व दिवसांतून दहा-पंधरा वेळां शौचास जाण्याची पाळी आली. प्रत्येक वेळीं शौचास जाऊन आल्यावर भर दोन प्रहरींसुद्धां तापलेली वाळू तुडवीत गंगा-प्रवाहापर्यंत जाऊन स्नान करून परत यावें अशी महाराजांची दिनचर्या होती. इतका उपद्रव होत असतांनासुद्धां महाराजांनीं त्याबद्दल कधीं कुरकुर केली नाहीं किंवा आपल्या नित्याच्या दिनक्रमांत कोणत्याहि तऱ्हेचा उणेपणा येऊं दिला नाहीं. जिवंत श्रद्धेचें काम हें असें असतें !

एकदां ग्वाल्हेर येथून आलेल्या एका शास्त्रीबुवांनीं "आपण संन्यासाश्रमी असतां मूर्तिपूजा कां करतां?" असें महाराजांस विचारलें. यावर "ही मूर्तीच आम्हांला सोडून जात नाहीं, मग आम्हीं काय करावें?" असें महाराजांनीं सांगितल्यावर शास्त्रीबुवा म्हणाले, "आपणच मूर्तीला सोडून द्या म्हणजे झालें." पुढें एके दिवशीं शास्त्रीबुवांना घेऊन महाराज गंगेच्या तीरावर गेले, आणि ती मूर्ती प्रवाहांत ठेवून तीरावर परत आले. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं प्रवाहांत ठेवून दिलेली ती आंगठ्याएवढी दत्तमूर्ती आपोआप महाराजांच्या समोर येऊन उभी राहिली! हें पाहिल्यावर मात्र शास्त्रीबुवांचा निर्गुण उपासनेबद्दलचा अहंकार नष्ट झाला आणि ते सगुण उपासना करूं लागले.

एकदां महाराज ध्यानस्थ बसले असतां ब्रह्मावर्तास प्लेग होणार असें महाराजांस समजलें. त्याप्रमाणें गांवांत प्लेग झाला व महाराजांचे भक्त श्री. अप्पा निगडीकर यांच्यावर प्लेगनें झडप घातली. याबद्दल महाराजांनीं लिहिलेलें पत्र असें आहे: "चार वर्षें बरोबर अप्पा या नांवाचे कर्नाटक ब्राह्मण होते. त्यांनीं साबेसुबेपणीं संन्यास घेऊन तत्काळ तीन वेळ प्रणव म्हणून देहोत्सर्ग केला. हें मरण योग्यांनाहि दुर्मीळ." (साबेसुबेपणीं म्हणजे शुद्धीवर असतांना).

पुढें महाराजांनाहि प्लेग झाला व ते प्लेगनें आजारी असतांनाच 'समश्लोकी गुरुचरित्र' करण्याबद्दल त्यांना देवांची आज्ञा झाली. रचना कशी असावी वगैरे सर्व गोष्टी देवांनीं सांगितल्या. त्याप्रमाणें 'समश्लोकी' हा ६७५० श्लोकांचा ग्रंथ तेथें ४५ दिवसांत पूर्ण झाला. हा ग्रंथ कसा होत गेला याबद्दल

ग्रंथाच्या शेवटीं दोन श्लोकांत महाराजांनीं सांगितलें आहे कीं, "प्रत्येक दिवशीं शंभरापेक्षां अधिक श्लोक झाले. त्यांतच पांच दिवस तर दोनशेंपेक्षांहि अधिक श्लोक तयार झाले." रोजचे सर्व कार्यक्रम नेहमींप्रमाणें चालू असतांना दोनशें श्लोक नुसते लिहून सुद्धां होणें कठीण; असें असतांहि ही रचना झाली यावरून महाराजांच्या आंगच्या दिव्य शक्तीची कोणासहि कल्पना येईल. प्लेग संपल्यावर लोक गांवांत येऊं लागले, तेव्हां महाराजांच्या सांगण्यावरून तेथें एकंदर नऊ नाम-सप्ताह करण्यांत आले.

प्रभूंच्या आज्ञेवांचून महाराज कोठें परगांवीं जात नसल्यामुळें काशीस रहाणारे थोर संन्यासी शांताश्रमस्वामी मुद्दाम महाराजांचे दर्शनासाठीं ब्रह्मावर्तास आले. शांताश्रमस्वामींनीं ४० वर्षें 'भागवता'चे अखंड सप्ताह केले होते. एकमेकांना पाहिल्याबरोबर या दोघांहि थोर सत्पुरुषांच्या नेत्रांतून आनंदाश्रूंचा प्रवाह सुरू झाला. शांताश्रमस्वामी तेथील वातावरणानें आनंदित झाले आणि त्या वेळीं ब्रह्मावर्तास चार महिने त्यांचा मुक्काम झाला. याच ठिकाणीं कार्तिक महिन्यांत महाराजांनीं 'सप्तशती गुरुचरित्र' हा सातशें ओव्यांचा प्राकृत ग्रंथ तयार केला. यांतील प्रत्येक ओवीमधलें तिसरें अक्षर वाचीत गेलें असतां भगवद्गीतेचा पंधरावा अध्याय तयार होतो. जवळ येणाऱ्या चातुर्मासांत मौन धरण्याचा महाराजांनीं विचार केला, पण मूर्तीच्या चालू व्यवस्थेसंबंधीं कांहींच योजना जमेना, तेव्हां महाराज म्हणाले, "ही मूर्ती कोणी चोरून कां नेत नाहीं ?" हें त्यांचें बोलणें ऐकून व्यंकटय्या नांवाच्या ब्राह्मण मुलानें ती मूर्ति मंडलेश्वरीं नेली, व तेथें तो त्या मूर्तीची पूजा करीत असे. तो मेल्यावर पुढें त्या

मूर्तीचें काय झालें हें समजलें नाहीं. मूर्ति नेली त्या वेळींच महाराज म्हणाले होते, "ही मूर्ति जेथें जाईल त्याच्या सर्वस्वाचा नाश होईल. कारण आपणांइतकी तिची पाळणूक कोणाकडूनहि होणार नाहीं."

## धन्य ते वाडीकर! : ७

* * * * * * * * * * * *

शके १८२६ चा चातुर्मास संपल्यानंतर नरसोबाच्या वाडीस जाण्याबद्दल महाराजांना प्रभूंची आज्ञा झाली. त्याबरोबर महाराज निघाले आणि कालपी, पिछोरा, रावेर, भेलसा, होशंगाबाद या गांवांवरून नरसोबावाडीस येऊन दाखल झाले. महाराज एकदम श्रीदत्तपादुकांसमोर येऊन उभे राहिले व "नमो ब्रह्मदेवा" हें पद म्हणून प्रार्थना केली. नंतर महाराज ब्रह्मानंदांच्या माडीवर जाऊन बसल्यावर महाराजांच्या आगमनानें आनंदित झालेली अनेक गांवकरी मंडळी दर्शनास आली. वाडीस या वेळीं अठ्ठेचाळीस दिवस महाराजांचा मुक्काम झाला, व या अवधींत महाराजांना सहज समाधीहि अनेक वेळां लागली. सहज समाधींत मग्न झालेल्या या महासिद्धाचें दुर्लभ असें दर्शन घेऊन वाडीकर भक्तमंडळी धन्य झाली. याच मुक्कामांत महाराजांचे प्रिय शिष्य श्रीदीक्षितस्वामी यांना महाराजांनीं दंड दिला व त्यांचें नांव 'नृसिंहसरस्वती' असें ठेवलें. याच मुक्कामांत एकदां महाराज समाधि-अवस्थेंत असतांना त्यांच्या तोंडून, पुजारी मंडळींना उद्देशून खालील शब्द आवेशयुक्त भाषेंत बाहेर पडले : "तुमचें आचरण बिघडलें आहे, तें तुम्ही सुधारावें. नाहींतर तीन वर्षें झालेली कांहींच नाहीं अशी भयंकर शिक्षा होईल." हें सर्व ऐकून

पुजारी मंडळी घाबरली व त्यांनीं महाराजांची क्षमा मागून, “आम्हां बालगोपालांचेकडून ... योग्य व इष्ट ती सेवा करवून घ्यावी,” अशी त्यांची प्रार्थना केली. याच मुक्कामांत महाराजांचा फोटो प्रथम घेण्यांत आला. चैत्र वद्य अमावास्येस श्रीनारायण-स्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव झाल्यानंतर प्रभूंच्या आज्ञेप्रमाणें महाराज वाडी सोडून निघाले, त्या वेळीं जमलेल्या हजारों भक्त-मंडळींना महाराजांनीं खालील शब्दांत उपदेश केला: ‘सदाचार न सोडतां श्रींची सेवा करावी, म्हणजे सर्व संकटांतून पार पडाल. नित्य ब्रह्मकर्म झाल्यावर थोडेंतरी गुरुचरित्र वाचल्याशिवाय अन्न घेऊं नका, म्हणजे कांहीं कमी पडणार नाहीं.”

वाडीहून शिरोळ, मिरज, अक्कलकोट या मार्गानें महाराज गाणगापुरास येऊन पोंचले. तेथें संगमावर प्रभूंचें दर्शन झालें. तेथें तप करणाऱ्या तुकाराम नांवाच्या ब्राह्मणावर अनुग्रह करून त्याला एक अष्टक रचून दिलें. गाणगापूरच्या प्रवासांत असतां श्रीकृष्णाबाईनें महाराजांना प्रत्यक्ष दर्शन देऊन ‘कृष्णालहरी’ करण्याची आज्ञा केली, त्या वेळीं श्रीदत्तप्रेरणेनें हें काव्य रचलें गेलें. काव्यरचना चालू असतां प्रत्यक्ष कृष्णाबाई पुढें येऊन उभी रहात असे. एकावन्न श्लोक रचून झाल्यावर ‘पुरे’ असें म्हणून कृष्णामाता अंतर्धान पावली ! पुढें हुमणाबाद, गंगाखेड, परळी-वैजनाथ, माहूर, औंढ्या नागनाथ इत्यादि गांवांवरून महाराज नरसी गांवांत येऊन पोंचले.

शके १८२७ चा चातुर्मास नरसी मुक्कामीं राममंदिरांत झाला. या ठिकाणीं ‘दत्तचंपू’ हें काव्य तयार झालें. चातुर्मासानंतर नरसी गांवांहून निघून गोटेगांव, वाशीम, कारंजा, अमरावती इत्यादि गांवांवरून महाराज भेलसा येथें पोंचले. तेथें दत्तजयंती

करून वासोदा, मुगावली या गांवांवरून फाल्गुनाच्या आरंभीं महाराज ब्रह्मावर्तास पोंचले. या वेळीं येथें वीस-पंचवीस दिवस मुक्काम झाला. तेथें एका परमहंसाचें महाराजांना दर्शन झालें. त्यांच्याबद्दल महाराज म्हणाले कीं, "असे परमहंस दुसरे कोणी पाहण्यांत आले नाहींत." ब्रह्मावर्ताहून निघून प्रयागमार्गें महाराज चैत्र शुद्ध अष्टमीस काशीस येऊन पोंचले. त्या वेळीं ऐंशी वर्षांचे प्रसिद्ध स्वामी श्रीस्वयंप्रकाश यांनीं महाराजांचे पुढें येऊन त्यांना साष्टांग नमस्कार घातला. काशीहून महाराज प्रयागला परत आले व तेथेंच देवांनीं महाराजांना नरसोबाचे वाडीस जाण्यास आज्ञा दिली. त्यामुळें भर उन्हाळयांत महाराज वाडीकडे जाण्यास निघाले. "वाडीकडे येणें होत आहे" असें महाराजांचें पत्र वाडीला पोहोचल्यामुळें तेथें मंडळींना अतिशय आनंद झाला. ब्रह्मावर्ताहून निघून जालवण, सिप्री, इंदूर, ओंकारेश्वर या गांवां-वरून महाराज बढवाईस आले व तेथेंच शके १८२८ चा चातुर्मास केला. या वेळच्या सर्व चातुर्मासांत तीन घास सत्तूचें पीठ, ताक आणि फळें इतकाच महाराजांचा आहार होता. या चातुर्मासांत ठिकठिकाणची अनेक भक्तमंडळी बढवाईस आली होती, व तेव्हां असा चमत्कार झाला कीं, यांच्यापैकीं आजारी मंडळींचे रोग ती मंडळी आपापल्या घरीं जाईपर्यंत महाराजांनीं रोखून धरले होते.

शके १८२८ च्या आश्विन वद्य षष्ठीला दुपारीं महाराज नरसोबाची वाडी येथें येऊन पोंचले. या वेळीं वाडी येथें दोन महिने मुक्काम झाला. महाराजांचे दर्शनानें वाडींतील मंडळी आनंदित झाली, आणि महाराज आल्याबद्दलची वार्ता त्यांनी गांवोगांवीं कळविली. सकाळीं पाठ देण्याचा कार्यक्रम झाल्यावर यात्रेकरू मंडळी महाराजांची पूजा करीत. अशा पूजांचे वेळीं व इतर

मार्गांनीं या वेळच्या मुक्कामांत भक्तमंडळींनीं हजारों रुपये महाराजांना अर्पण केले. महाराज तर द्रव्यास स्पर्शही करीत नसल्यामुळें हें सर्व द्रव्य पुजारी मंडळी घेत असत. दररोज दुपारीं श्रीनारायणस्वामींचे कट्ट्यावर बसून महाराज आपल्याकडे येणाऱ्या मंडळींना संकटनिवारणाच्या बावतींत किंवा अन्य बाबतींत मार्ग-दर्शन करीत. परदेशी साखर, मेणवत्ती व परदेशी कापूर या गोष्टींना तेथें पूर्ण बंदी होती. एकदां सायंकाळीं ' कृष्णालहरीं'तील एक श्लोक समजाऊन देत असतां देवाचे मंडपांत धूप पडून आरती सुरू झाली, तेव्हां महाराजांचा कंठ दाटून येऊन डोळयांतून प्रेमाश्रु वाहूं लागले आणि बोलणें बंद झालें. थोडया वेळानें महाराज म्हणाले, " दयासागर प्रभु या ठिकाणीं भक्त-कार्याकरितां येऊन राहिला आहे, ही केवढी भाग्याची व आनंदाची गोष्ट आहे ! प्रभूचें भक्तवात्सल्य अवर्णनीय आहे."

आश्विन वद्य दशमीस महाराज प्रातःकाळीं स्नानाकरितां श्रीकृष्णातीरावर आले असतां त्यांना श्रीदत्तप्रभूचें प्रत्यक्ष दर्शन घडलें. नित्याचें आन्हिक आटोपल्यावर श्रीदत्तपादुकांचे दर्शना-करितां महाराज आले असतां त्यांना तेथेंच समाधि लागली व तत्काळ रामेश्वराचे यात्रेस जाण्याबद्दल महाराजांना प्रभूंची आज्ञा झाली. पण महाराजांनीं जाऊं नये म्हणून संततधारेचें अनुष्ठान सुरू करतांच पुन्हां आज्ञा होईपर्यंत थांबण्याचा आदेश मिळाला व त्यामुळें सर्वांना आनंद झाला. त्या दिवशीं सायंकाळीं पांच वाजे-पर्यंत महाराज ब्रह्मानंदाचे मठांत समाधि-स्थितींतच होते, तथापि त्याच दिवशीं दुपारीं महाराजांनीं कालकुंद्रीकरांच्या घरीं जाऊन भिक्षा केली हेंहि अनेक लोकांनीं पाहिलें !

सर्व आयुष्यांत फक्त चार-पांच वेळांच भक्तांच्या आग्रहाकरितां ऊन पाण्यानें स्नान करण्याचा प्रसंग महाराजांच्यावर आला असें सांगतात.

उपासनेबद्दल श्री.बाळू साधले यांना उपदेश करतांना महाराज म्हणाले होते कीं, "ब्राह्मणाला गायत्रीमंत्र हाच मुख्य मंत्र असल्यानें त्याचेंच पुरश्चरण करून ब्राह्मणानें कार्यसिद्धी करून घ्यावी. तसेंच आपल्या कुलदेवतेचा मंत्रजपहि करावा. आपल्या कुळांतील कोणी तपस्वी पुरुषांनीं जी देवता प्रसन्न करून घेतली असेल तीच कुलदेवता. ती त्या कुलांतील माणसांचें रक्षण करते." एकदां श्री. गणेश सातवळेकरांनीं महाराजांना विचारलें कीं, "आपणांस पुनर्जन्म आहे काय?" त्यावर महाराज म्हणाले, "होय, हा तर अरुणोदय आहे."

एक गृहस्थ, एकाएकीं वेड लागलेल्या आपल्या मुलाला घेऊन महाराजांकडे आले व मुलाचें वेड घालवावें अशी त्यांनीं महाराजांना विनंती केली. हें बोलणें ऐकून महाराजांनी त्या मुलाकडे पाहिलें तेव्हां तो मुलगाहि महाराजांकडे टक लावून पाहूं लागला; अशा स्थितींत सुमारें पंधरा मिनिटें गेलीं. नंतर महाराजांनीं त्याच्या बापास सांगितलें कीं, "या मुलाचें वेड बरें होण्यासारखें नाहीं. पण तें अपायकारक नाहीं एवढें मात्र खास; उलट कल्याणकारकच ठरेल." तो गृहस्थ आपल्या मुलाला घेऊन गेल्यावर महाराज मंडळींना म्हणाले, "हा मुलगा कोणीतरी पूर्वजन्मींचा योगभ्रष्ट पुरुष आहे. लोकांची उपाधी नको म्हणून हें वेडयाचें सोंग यानें मुद्दाम घेतलें आहे. दक्षिणेंत हा मोठा सिद्ध पुरुष आज आपल्या पाहण्यांत आला."

सरस्वतीबाई नांवाची वेश्या विरक्त होऊन वाडी येथें सेवे-करितां राहिली होती. ती बाई उत्तम गाणारी असल्यामुळें देवा-पुढें रोज 'करुणात्रिपदी' म्हणत असे. तिनें एकदां उत्तम ताल-सुरावर महाराजांचे पुढें 'करुणात्रिपदी' म्हणून दाखविली. तिची भक्ती पाहून महाराज प्रसन्न झाले, व महाराजांनीं तिला 'भावें नमूं श्रीगुरुच्या पदांसी' हें गुरुस्तोत्र लिहून दिलें व कांहीं ध्यानाभ्यासहि सांगितला. सरस्वतीबाईनीं आमरण सद्‌गुरूंच्या आज्ञेप्रमाणें वागून आपल्या जन्माचें सार्थक केलें.

++ ++ ++

# कर्नाटकसंचार व महाराजांवर वॉरंट! : ९

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मार्गशीर्ष वद्य सप्तमीस सकाळीं श्रीगुरूंच्या पादुकांसमोर वंदन करीत असतां महाराजांना तेथेंच समाधि लागली, व त्या अवस्थेंतच रामेश्वराकडे जाण्याची आज्ञा झाली. त्याप्रमाणें वाडी-करांचा निरोप घेऊन महाराज कुरुंदवाडकरांचे घाटावर। गेले; त्या वेळीं संध्याकाळ होऊन गेली होती. कुरुंदवाडाहून निघून तेरवाड, मलिकवाड, संकेश्वर, केंगेरी, या गांवांकरून गुर्लहोसूर या श्रीचिदंबरदिक्षित यांच्या गांवीं ते येऊन पोंचले. प्रसिद्ध वेदांती बाबा गर्दे यांना येथेंच महाराजांचें दर्शन झालें. तेथून पुढे येल्लमा देवीचें दर्शन करून तुंगभद्रातीरावर हम्पी क्षेत्रांत विद्यारण्यस्वामींचे मठांत महाराज येऊन उतरले. पुढें शेषाचल पर्वतावर येऊन त्यांनीं कार्तिकस्वामींचें दर्शन केलें, व या ठिकाणीं 'कुमारशिक्षा' हा ग्रंथ लिहिला. नंतर श्रीरंग, श्रीशैलमल्लिकार्जुन व श्रीव्यंकटेश यांचें दर्शन करून चिदंबरक्षेत्रीं महाराज येऊन पोंचले. तेथून पुढें रामेश्वराची यात्रा करून आषाढ शुद्ध चतुर्दशीला तंजावरास आले व शके १८२९ चा चातुर्मास येथेंच झाला. या ठिकाणीं 'संस्कृत समश्लोकी गुरुचरित्रा'ची चूर्णिका महाराजांनीं लिहिली. तंजावरला महाराजांनीं 'कृष्णालहरी'वर संस्कृत टीका लिहिली. भाद्रपदी पौर्णिमेस चातुर्मास संपल्यावर महाराज तेथून निघाले व जंबुकेश्वर, कोटिलिंग, श्रीरंग या गांवांवरून सत्यमंगल या गांवीं आले. या

ठिकाणीं "कावेरी-तीरावरच संचार करावा, पुढील भागांत प्लेग असल्यामुळें जाऊं नये," अशी महाराजांना प्रभूंची आज्ञा झाली. नंतर नेलोर येथें श्रीसदाशिव ब्रह्मेंद्रस्वामींच्या समाधीचें दर्शन घेऊन, त्रिपुरासूर,कोटिलिंग या गांवांवरून कृष्णा-तीरावरील मुक्त्याला गांवीं महाराज येऊन पोंचले व शके १८३०चा चातुर्मास तेथेंच केला. येथील मुक्कामांत 'युवशिक्षा' 'वृद्धशिक्षा' व 'स्त्रीशिक्षा' हे ग्रंथ महाराजांनीं लिहिले.

कार्तिक वद्यांत महाराजांना देवांनीं सांगितलें कीं, "आतां सरळ काश्मीर प्रांतात चलावें." हें ऐकून महाराजांनीं देवांना स्पष्ट सांगितलें कीं, "आपण कांहीं काश्मीरकडे जाऊं इच्छीत नाहीं. देवाला वाटत असेल तर तंतुक किंवा गंगानुज यांच्याप्रमाणें हा देह कोठेंहि नेऊन ठेवावा!" या वेळीं मात्र देवांचें न ऐकतां महाराजांनी पुढें गोदावरी-तीरावरच संचार केला. यानंतर पौष वद्यांत महाराज पीठापूर या श्रीपाद श्रीवल्लभांच्या जन्मगांवीं येऊन पोंचले. तेथें श्रीगुरूंच्या जन्मस्थानीं महाराजांनीं पादुकांची स्थापना केली. पुढें फिरत फिरत गोदावरी-तीरावर मंथन कालेश्वर येथें आले; व देवांच्या आज्ञेविरुद्ध तेथेंच चातुर्मास करण्याचें त्यांनीं ठरविलें. तेव्हां प्रभूंना राग येऊन अत्यंत उग्र स्वरूपांत महाराजांना प्रभूंचें दर्शन झाल्यावर 'तव कोपा वंदूं रुद्रा। तव चापा वंदूं भद्रा।' या अभंगानें महाराजांनी प्रभूंची स्तुति केली. मग प्रभूंचा राग शांत झाला व महाराजांनींहि आज्ञेप्रमाणें पुढें जाण्याचें ठरविलें.

शके १८३१ चा चातुर्मास महाराजांनी वैनगंगेच्या तीरावरील पवनी येथें केला. तेथें आसपास प्लेग सुरू झाला होता, परंतु महाराजांच्या प्रार्थनेवरून प्रभूंनीं अभय दिलें, व त्यामुळें तेथें चातुर्मासांत प्लेग झाला नाहीं. चातुर्मास संपल्यावरोबर

महाराज पवनीहून बाहेर पडले. महाराजांचें पाऊल बाहेर पडतांच आतांपर्यंत थांबविलेला प्लेग जोरानें गांवांत शिरला व त्यानें खूप संहार केला! पवनीहून निघून उनकेश्वर, माहूर या गांवांवरून महाराज वाडीकडे निघाले असतां, 'वाडीकडे न जातां मागें फिरावें' अशी देवांची आज्ञा झाली. पण महाराजांनीं तिकडे लक्ष न दिल्यामुळें त्यांना संधिवाताचा भयंकर त्रास सुरू झाला. तशा स्थितींतहि महाराज दररोज १०–१५ मैल प्रवास करीत पुढें चालले; तेव्हां देव त्यांच्यावर रागावले व 'तूं माझें ऐकत नाहींस तर गोदावरीचे पलीकडे जातांच तुझ्यावर वॉरंट निघेल,' असें देवांनीं त्यांना सांगितलें! पुढें आजेगांव, रेणापूर, गंगामसले या गांवांवरून निघाले असतां देवांनीं सांगितल्याप्रमाणें महाराजांना शौचाचे वेळीं रक्त पडण्यास सुरुवात झाली; पण तरीहि प्रवास चालूंच राहिला. पुढें बार्शी-पंढरपुरावरून महाराज पौष शुद्धांत वाडीस येऊन पोंचले. या मुक्कामांतहि नेहमीप्रमाणें भक्त-मंडळींची गर्दी झाली व शेंकडों लोकांना महाराजांनीं संकटमुक्त केलें. एकदां सायंकाळीं खालीं धूप पडला असतां, ब्रह्मानंदाच्या माडींत महाराज बसले असतांना महाराजांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्याचें कारण विचारल्यावर महाराज म्हणाले, 'प्रभूचें भक्तवात्सल्य आठवून आपली अशी स्थिती होते. गिरनार, माहूर इत्यादि अवघड जागीं येण्यास भक्तांना त्रास पडेल म्हणून भक्त-वत्सल परमात्मा या उघड्या मैदानावर येऊन बसला आहे.' हें ऐकून मंडळींना महाराजांच्या शुद्ध भक्ति-प्रेमाची कल्पना आली.

या मुक्कामांत एकदां महामारीचा सार्वत्रिक उपद्रव थांबविण्याकरितां महाराजांनीं श्रीदत्त-पादुकांवर अभिषेक करण्यास सांगितला.त्यावर 'अभिषेकानें महामारी कशी जाते?' असें लोकांनीं

विचारल्यावरून महाराजांनीं उत्तर दिलें कीं,'मृत्युरूप परमेश्वराच्या महामारी इत्यादि या शक्ति आहेत. मृत्युरूप परमेश्वराला अभिषेकानें शांत केलें म्हणजे त्या शक्तीहि शांत होतात.' त्याप्रमाणें लोकांनीं महारुद्राभिषेक केला व त्यामुळें महामारी शांत झाली.

वैशाखी पौर्णिमेनंतर देवांची 'शृंगेरीला चलावें' अशी आज्ञा झाल्यामुळें, महाराज श्रीपादुकांस वंदन करून लगेच पंचगंगा ओलांडून पलीकडे निघून गेले. तेथून टाकळी, बेळगांव, गुर्लहोसूर या गांवांवरून धारवाडास येऊन मद्दीहाळ येथे दत्तमंदिरांत मुक्काम केला. येथून श्रीगांडाबुवांना, प्रभूंनीं सांगितल्याप्रमाणें, एक लक्ष गायत्री-जप करण्याकरितां महाराजांनीं भडोचला पाठवून दिलें; व आपण धारवाडाहून निघून तुंगभद्रातीरावर हावनूर या गांवीं येऊन पोंचले.

हावनूर येथें त्रिपुरांतकेश्वराचे देवळांत महाराज राहिले व शके १८३२ चा चातुर्मास येथेंच केला. पुण्याचे श्री. वामनराव गुळवणी येथें महाराजांचे दर्शनास आले होते. महाराजांचे आज्ञेप्रमाणें ८–१० दिवस तेथें राहून ते परत गेले. कानडी प्रांत असूनहि येथें महाराजांची कीर्ति सर्वत्र पसरूं लागली व गर्दीहि वाढूं लागली. चातुर्मास पूर्ण होतांच महाराज हावनूरहून निघाले, व तुंगभद्रा,वर्धासंगम, कुपेलूर, शृंगेरी, बनवासी, गोकर्ण, गुर्लहोसूर या गांवांवरून गलगलीस आले. गलगली येथील मंडळींनीं महाराजांचे मुक्कामांत एकंदर बारा स्वाहाकार केले !

एकदम गुप्त होणें, एकदम दूर जाणें इत्यादि कामासाठीं सिद्धींचा उपयोग आपण फक्त तीन वेळां केला असें महाराजांनीं एकदा सहज बोलतांना सांगितलें.

# कुरुगड्डी ते गरुडेश्वर : १०

* * * * * * * * * * * * * * *

पुढें कृष्णातीरानें प्रवास करीत महाराज मलप्रभा-कृष्णा-संगमावर चैत्र अमावास्येस येऊन पोंचले व तेथून विश्वामित्रांचें तपस्थान 'छाया भगवती' याच्या दर्शनास गेले. तेथून कोपरगांवीं नृसिंहाचें दर्शन करून कडलूर गांवांवरून कुरुगड्डी या श्रीपाद श्रीवल्लभांचे स्थानीं वैशाख वद्य षष्ठीस येऊन पोंचले. या स्थानाच्या सर्व बाजूंनीं कृष्णेचा प्रवाह असून तेथें पुष्कळ जंगल आहे, व म्हणून या बेटांत पूर्ण एकान्त आहे. मध्य रेल्वेच्या रायचूर व कृष्णा स्टेशनहून हें स्थान सुमारें वीस मैल दूर आहे. येथें नदींत खडक असल्यामुळें होड्यांच्याऐवजी भोपळ्यांच्या सांगडीवरून जावें लागतें. महाराज येथें येण्याचे अगोदर तेथील पुजारी भीमाण्णा याला देवांनीं दृष्टान्त देऊन सांगितले कीं, "एक महिन्यानें आमचे एक परमभक्त संन्यासी येथें येतील. त्यांची व्यवस्था उत्तम ठेव, नाहींतर तुला शिक्षा होईल." महाराजांनाहि देवांनीं असें सांगितलें कीं, "या स्थानीं चातुर्मास करावा, म्हणजे पुष्कळ मंडळी येथें येऊन हें स्थान प्रसिद्धीस येईल." याच ठिकाणीं शके १८३३ चा चातुर्मास झाला.

कुरुगड्डी या बेटाला कुरवपूर असेंहि म्हणतात. श्रीपाद श्रीवल्लभ यांनीं येथें कांहीं काल वास्तव्य केलें व ते आश्विन वद्य द्वादशीस येथेंच अदृश्य झाले. येथें तेलगू व कानडी भाषा चालतात. हें बेट एक मैल लांब व अर्धा मैल रुंद आहे. एका टोंकास श्रीदत्त-

मंदिर, दुसऱ्या टोंकास गांव व मध्यें शेतें आहेत. मंदिरांत श्रीदत्त-पादुका आहेत. बेटाच्या दुसऱ्या बाजूस प्रवाहाचे तीरावर श्रीपाद श्रीवल्लभांच्या पावलांचे ठसे पुष्कळच उमटलेले दिसतात. एका शिळेवर नमस्कार घातल्याप्रमाणें सर्व शरिराचा ठसा उमटलेला आहे. या स्थानांत सेवेकऱ्यांच्या कामाचा निर्णय लवकर होतो.

महाराजांच्या चातुर्मासाची वार्ता सर्वत्र पसरून या अडचणी-च्या जागींहि भक्त मंडळींची गर्दी वाढूं लागली. अनेक लोकांच्या सहकार्यामुळें कुरवपुरासारख्या ठिकाणींहि यात्रेकरूंना नित्य पक्वानांचें भोजन मिळूं लागलें. आषाढांत कृष्णाबाई महाराजांच्या स्वप्नांत आली व आपणांस "डाळ तरी द्या" असें तिनें सांगितलें. आषाढी पौर्णिमेस महाराजांनीं व्यासपूजा केली. सायंकाळीं कृष्णामातेची उत्तम प्रकारें पूजा करून भिजलेल्या डाळीचा नैवेद्य दाखविला व ती डाळ सर्व लोकांना वाटली. शेतकरी स्त्रियांना बोलावून त्यांच्या ओटचा भरून त्यांना प्रसाद दिला. रायचूरचे व्यापारी तुळजाराम पतंगे यांनीं चातुर्मासांत सर्व सामान पुरविलें होतें. त्यांच्या बायकोला व सुनेला पिशाच्च-बाधा होती, त्याबद्दल महाराजांना निघतेवेळीं विचारलें असतां महाराज कांहीं बोलले नाहींत. तेव्हां महाराज ज्यावर झोंपत असत तें पोतें गांडाबुवांनीं श्री. पतंगे यांना दिलें व म्हणाले, " हें पोतें घरांत ठेवून याची नित्य पूजा करा व याच्या दशा भिजवून तें पाणी पिशाच्च-पीडा असणारांना द्या, म्हणजे सर्व बरें होईल." त्याप्रमाणें श्रद्धेनें करतांच त्यांच्या घरांतील पीडा दूर झाली.

कुरुगड्डीस गुरुद्वादशी करून महाराज तेथून निघाले. पुढें तुळजापुरास जाऊन त्यांनीं जगदंबेचें दर्शन केलें व तेथून वांजरा-तीरावर दत्तजयंती करून गोदावरी-तीरावर आले. पुढें गोदावरी-

संगमावरून परळीवैजनाथांचें दर्शन घेऊन पौषारंभीं राजूर या गांवीं पोंचले. येथें महाराजांचे बंधु सीतारामबुवा यांनीं महाराजांच्या अनुज्ञेने संहितास्वाहाकार केला. आठ दिवस फार मोठ्या प्रमाणावर हा समारंभ झाला. सुमारें एक लाख मंडळी दर्शनार्थ येऊन गेली. नंतर राजुराहून निघून पिंपरीवरून महाराज आवंढ्यानागनाथाच्या दर्शनास गेले. हें बारा ज्योतिर्लिंगांतील मुख्य स्थान आहे. येथून उटी, बामणी, हिंगोली, गोपेगांव, मंजीरथ, पैठण, दौलताबाद, वेरूळ या गांवांवरून इंदूर संस्थानांतील चिखलदा या गांवीं ते येऊन पोंचले.

चिखलदा हें गांव इंदूर संस्थानांत आहे. येथेंच महाराजांचा शके १८३४ चा चातुर्मास झाला. चिखलदा येथें सहा-सात महिने मुक्काम झाला. तेथून नर्मदाकिनारीं कातरखेडा या गांवच्या शूलपाणीश्वरास वंदन करून अरण्यांतूनच महाराज गरुडेश्वराकडे निघाले. या वेळीं एका भिल्लानें महाराजांना मार्गदर्शन करून त्यांना गरुडेश्वराजवळ आणून सोडलें, व तो म्हणाला, " तें समोर मंदिर आहे तेथें चला." इतक्यांत महाराजांना संशय येऊन त्यांनीं त्या भिल्लास विचारलें, " तूं कोण आहेस ते खरें सांग." यावर " मी अश्वत्थामा असून या जंगलांत राहातो, " असें सांगून तो भिल्ल दिसेनासा झाला. नंतर महाराज गरुडेश्वराच्या देवळाच्या ओटचावर येऊन उतरले. त्या दिवशीं चैत्र वद्य षष्ठी होती.

महाराजांचा शके १८३५ चा चातुर्मास गरुडेश्वर येथेंच झाला हाच त्यांचा शेवटचा चातुर्मास होय. महाराज गरुडेश्वर येथें आलें त्या वेळीं तेथें फक्त भिल्ल लोकांची थोडी वस्ती होती आणि विष्णुपंत सोमण यांचें किराणा मालाचें दुकान होतें. परंतु महाराज तेथें येतांच गरुडेश्वराचें हें स्वरूप हळुहळु बदलत गेलें.

वस्ती वाढली आणि राहाण्याच्या कांहीं सोयीहि निर्माण झाल्या. रामशास्त्री प्रकाशकर वैशाख महिन्याच्या आरंभीं महाराजांच्या दर्शनास येथें आले; त्यांना महाराजांनीं सांगितलें कीं, "येथून आतां आपलें कोठें जाणें होणार नाहीं." यात्रा जमूं लागली तेव्हां कामेंहि खूप वाढलीं. परंतु येणारी मंडळी आपला मोठेपणा बाजूला ठेवून तेथें वाटेल तीं कामें करीत असत. श्रीदत्तप्रभूचा नैवेद्य झाल्यावर सर्वांचें जेवण होत असे. पुढें पुढें दररोज चारशेंपर्यंत पानें होऊं लागलीं. महाराजांच्या पुढें येणाऱ्या पैशांतून सर्व खर्च चालत असे "आज अमुक मंडळी येणार आहेत, अशा पद्धतीचा स्वयंपाक करा," असें महाराज सकाळींच सांगत. एकदां नर्मदेच्या पुराचें पाणी बरेंच चढलें, तेव्हां नर्मदेवर जाऊन, "माते ! आतां आपला पूर वर येऊं नये, " असें म्हणून महाराजांनीं आपला दंड नर्मदाजलांत बुडविला; आणि दंडस्पर्श होतांच पाणी कमी होऊं लागलें.

हिंदु लोकांप्रमाणेंच महाराजांचे कांहीं पारशी भक्तहि होते. गरुडेश्वरीं बरीच पारशी मंडळी येत असत. कांहीं मुसलमानहि रोगार्त होऊन महाराजांकडे आले असतां, त्यांना औषध आणि कुराणांतील मंत्र सांगून महाराजांनीं बरें केलें.

गरुडेश्वरीं महाराजांनीं 'आत्मानात्म विचार' व 'चित्त-सद्बोध नक्षत्रमाला' हे प्राकृत ग्रंथ तयार केले. मुंबईचे आनंदराव रामकृष्णराव तालचेरकर यांची नात कुमारी इंदिराबाई यांचा साखरपुडा इंदूरचे महाराज श्रीमंत सवाई तुकोजीराव होळकर यांचेबरोबर इंदुरासच शके १८३४ मध्यें झाला होता. परंतु पुढें महाराज युरोपच्या सफरीला गेल्यामुळें लग्नाचें निश्चित झालेलें नव्हतें. तेव्हां इंदिराबाईच्या घरच्या मंडळींनीं हें जमलेलें

लग्न पार पडावें म्हणून महाराजांची प्रार्थना केली, तेव्हां "मुलीकडून निष्काम शिवाराधना व्हावी व 'देवेंद्राणि नमस्तुभ्यं' या मंत्राचा जप करवावा. मार्गशीर्ष मासांत कार्य होईल," असें महाराजांनीं त्यांना सांगितलें. त्याप्रमाणें उपासना घडतांच मार्गशीर्ष शुद्ध दशमी, सोमवार, शके १८३५ या दिवशीं कुमारी इंदिराबाई यांचेबरोबर राजेसाहेबांचा विवाह झाला. नंतर त्यांचें नांव सौ. महाराणीसाहेब इंदिराबाई होळकर असें झालें. महाराजांच्या ठिकाणीं या राणीसाहेबांची फार मोठी निष्ठा होती. त्यांनीं गरुडेश्वर येथें नर्मदेस घाट बांधला असून माणगांव, कुरुगड्डी, कारंजा इत्यादि स्थानांतूनहि अनेक देणग्या दिलेल्या आहेत.

# उपदेश आणि महासमाधी : ११

* * * * * * * * * * * * * * * * * *

येथें वडोदें येथील विठ्ठल सोनारानें दत्तमूर्ति करून आणली; श्री. रामचंद्रशास्त्री प्रकाशकर यांनीं आश्विन शुद्ध नवमीला श्री. धोंडोपंत कोपरकर यांच्या हस्तें त्या मूर्तीची प्रतिष्ठा करविली. नंतर ब्राह्मणांकडून पूजा सुरू झाली. पुढें देवांच्या सांगण्यावरून या मूर्तीची यथाविधि अर्चा करण्यांत आली. ही मूर्ति पर्णकुटीमध्यें लहानशा सिंहासनावर ठेवली होती. नरसोबाच्या वाडीप्रमाणें त्रिकाल पूजा इत्यादि उपासना तेथेंहि सुरू झाली. देवापुढें येणाऱ्या द्रव्याचा कांहीं भाग माणगांवाप्रमाणेंच येथूनहि वाडी येथें पाठविला जाई. एकदां सकाळीं भाष्यपाठ संपल्यावर महाराज म्हणाले कीं,

"आजपर्यंत जो प्रत्यक्ष उपदेश केला व ग्रंथ लिहिले त्या सर्वांचें सार आज सांगावयाचें आहे. मुक्तीचा लाभ करून घेणें हें मनुष्य-जन्माचें मुख्य कर्तव्य आहे. त्याकरितां प्रथम मन स्थिर व्हावें या उद्देशानें, वर्णाश्रमाप्रमाणें आपापल्या धर्माचें आचरण शास्त्राप्रमाणें झालें पाहिजे. वेदांताचें श्रवण, मनन व निदिध्यासन नित्य करावें. मुख्यत: श्रवणाकडे अधिक लक्ष द्यावें, त्यामुळें मनांतील आसक्ति कमी होईल. सात्त्विक प्रवृत्तीमुळेंच मानवांची उन्नति होते. अशी प्रवृत्ति होण्याकरितां आपला आहार हितकारक, मर्यादित

आणि शुद्ध ठेवण्याकडे लक्ष दिलें पाहिजे ....उदर-निर्वाहाकरितां व्यापार, शेती, नोकरी कोणताहि धंदा केला तरी वेदविहित कर्म व गुर्वाज्ञापालन हीं कधींहि सोडूं नयेत. स्वकर्म केलें तरच अंतःकरण शुद्ध होतें; अंतःकरण शुद्ध झालें तर उपासना स्थिर होते, उपासना स्थिर झाली तर मनाला शांति मिळते, आणि मनाची गडबड थांबली म्हणजे आत्मज्ञान होऊन मोक्षाचा लाभ होतो. . . . हें सर्व थोडक्यांत सांगितलें आहे, याप्रमाणें जो वागेल तो शेवटीं पूर्ण सुखी होईल."

शके १८३६ च्या वैशाखांत महाराजांच्या मूळच्या अतिसार या रोगानें उचल खाल्ली व शरीर दिवसेंदिवस क्षीण होत चाललें. महाराजांना बरें वाटावें म्हणून गुरुपादुकांवर संततधार अनुष्ठान करणाऱ्या वाडीच्या भक्तांना महाराजांनीं कळविलें कीं, "उगीच देवाला त्रास देऊं नका. हें शरीर अल्पावधींतच पडणार आहे." मूर्तीच्या व्यवस्थेबद्दल महाराजांनीं विचारलें असतां देव म्हणाले, "आम्हांला येथेंच राहावयाचें आहे. मूर्ति कोठेंहि पाठवूं नयें." यामुळें तेव्हांपासून देवापुढें येणारा पैसा वाडीला पाठविण्याचें वंद झालें.

शेवटीं महिनाभर महाराज पडूनच होते. तशा अवस्थेंतहि ते दुसऱ्याला सांगून पत्रांचीं उत्तरें पाठवीत असत. या काळांत महाराज नेहमीं ध्यानांत निमग्न असत. सवंध दिवसांतून फार तर पांच-दहा वाक्यें बोलत. एखादे दिवशीं मात्र याला अपवाद होई. या नव्या दत्त-स्थानाची कांहींतरी व्यवस्था व्हावी या उद्देशानें ब्रह्मानंदस्वामींनीं तेथे एक पंचसमिती नेमली. श्रीनृसिंहसरस्वती (महाराजांचे एक प्रमुख शिष्य) हे या समितीचे अध्यक्ष होते.

महाराजांनीं औषध घ्यावें अशी भक्त मंडळींनीं प्रार्थना केली तेव्हां महाराज म्हणाले, "हा देह लवकरच सोडून जावयाचें आहे, करितां औषधोपचाराचें कारण नाहीं. श्रीशंकराचार्य बत्तीस वर्षें राहिले, त्या मानानें हें शरीर जास्त टिकलें .... जन्मापासून ज्या वैद्याला धरलें आहे तो वैद्य या वेळींहि आहेच, त्याची इच्छा जशी असेल तसें होईल." आणि यानंतर भीष्माचार्यांनीं शेवटीं म्हटलेले श्लोक महाराजांनीं सर्वांना म्हणून दाखविले.

प्रथम निर्याणाचा दिवस ज्येष्ठ वद्य अष्टमी हा होता, पण त्या दिवशीं जाण्याची महाराजांची इच्छा नव्हती. अष्टमी लागतांच महाराज तीन तास समाधिमग्न होऊन बसले, व समाधि उतरल्यावर म्हणाले, "आजचा निर्याणाचा प्रसंग होता, पण तो टळला." या वेळीं शरिरांत ऊष्णता फार वाढली व क्षीणताहि अतिशय आली. अंगावर सारखें थंड पाणी शिंपडावें लागे. अशा स्थितींतहि महाराज मुखानें "दत्त दत्त" म्हणत व इतरांनाहि दत्तनाम घेण्यास सांगत.

ज्येष्ठ वद्य अमावास्येच्या दिवशीं "आज अमावास्या संपल्यावर हा स्थूल देह सोडावयाचा आहे," असें महाराजांनीं सांगितलें होतें. अमावास्या संपून प्रतिपदा लागतांच महाराज सिद्धासन घालून बसले. प्रथम पूर्वाभिमुख बसले होते, पण देवाकडे पाठ होते म्हणून पश्चिमेकडे देवासमोर मुख केलें. देवाकडे पाहून त्राटक केलें, श्वासाचा निरोध करून दीर्घ प्रणवोच्चार करीत महाराजांनीं देहाचें विसर्जन केलें, आणि महाराज ब्रह्मस्वरूपीं लीन झाले. त्या वेळीं शके १८३६, आषाढ शुद्ध प्रतिपदा, मंगळवार, आर्द्रा नक्षत्र, उत्तरायण होतें व वेळ रात्रीं सुमारें अकरा वाजण्याची होती.


दुसरे दिवशीं सकाळीं भक्तमंडळींनीं महाराजांच्या पुण्यमय शरिरावर वेदोक्त मंत्रांनीं अभिषेक केला, व षोडशोपचारांनीं पूजा केली. बेल, तुळशी, फुलें यांच्या माळा गळयांत घातल्या व फुलांच्या आसनावर बसवून महाराजांचें शरीर नर्मदा-तीरावर नेलें; आणि तेथेंहि त्याची पूजा करून तें परमपवित्र मंगल शरीर शेवटीं नर्मदामातेच्या जलांत सोडून दिलें.

महाराजांचें लौकिक आणि लोकोत्तर चरित्र येथें संपलें. देह्-दृष्टीनें महाराज जगाच्या दृष्टीआड गेले असले तरी भक्तांकरितां ते सदैव सर्वत्रच आहेत. अगदीं लहानपणापासून शास्त्रशुद्ध धर्माचरणाकरितां व प्रभूची कृपा होऊन धर्म-प्रचाराची आज्ञा मिळाल्यानंतर लोकांना धर्म-मार्गाचें प्रत्यक्ष शिक्षण देण्याकरितां आणि परोपकाराकरितां महाराजांनीं आपली काया चंदनाप्रमाणें कणाकणानें वर्षानुवर्षें झिजविली. स्वतःचा संसार संपल्यावर गिरिकंदरांत न जातां, हजारों मैल रात्रंदिवस फिरून, भारतांतील हजारों गांवांना भेटी देऊन आणि हजारों लोकांना इहपर सौख्य-प्राप्तीकरतां सन्मार्ग दाखवून या लोकोत्तर संन्याशानें लोकसंग्रहाचा आदर्श संसार करून दाखविला. हिंदु धर्मांतील आचार्यपदावर अधिकार सांगणाऱ्या श्रेष्ठ धार्मिक पुढाऱ्यांनाहि आदर्श असें हें महाराजांचें असामान्य चरित्र आहे. महाराष्ट्रालाच नव्हे तर सर्व भारताला अभिमान वाटावा असें लोकविलक्षण, प्रभावी व लोककल्याणमय धार्मिक जीवन महाराजांनीं आचरून दाखविलें.

॥ श्रीभगवान् दत्तात्रेयार्पणमस्तु ॥


**समाधि-स्थानें :**

गरुडेश्वर येथें नर्मदेला सुमारें पावणेदोनशें पायऱ्यांचा सुन्दर घाट बांधलेला असून, नदी ओलांडून येणाऱ्या यात्रेकरूंची नाव याच घाटास लागते. घाटाच्या सुमारें शंभर पायऱ्या चढून गेल्यानंतर श्रीवासुदेवानंद सरस्वतींचें समाधि मंदिर लागतें. या मंदिरांत श्रीमहाराजांचें पूर्ण आकृतीचें छायाचित्र, महाराजांची छाटी व ते बसत असत तो पाट इत्यादि वस्तु ठेविलेल्या आहेत. या देवळाभोंवतीं प्रदक्षिणा घालतां येण्याजोगी थोडी जागा आहे. येथून आणखी पाऊणशें-ऐंशी पायऱ्या चढून गेल्यावर, महाराज शेवटच्या दिवसांत ज्या दत्त-मूर्तीची उपासना करीत त्या मूर्तीचें दर्शन घडतें. हें काळ्या पाषाणाचें दत्तमंदिर लहानसेंच पण सुबक असून, मूर्ति सुमारें सहा इंच उंचीची आहे. या मंदिरांत श्रीमहाराजांच्या इतर वस्तु ठेविलेल्या आहेत. श्रीदत्तप्रभूंची व श्रीमहाराजांची दररोज त्रिकाळ पूजाअर्चा होते. पूजेसाठीं महाराष्ट्रीय ब्राह्मणच ठेवावयाचे अशी प्रथा आहे.




श्रीसमाधि मंदिर

श्रीनरसोबाची वाडी येथेंहि श्रीमहाराजांचें एक स्मृतिमंदिर बांधलेलें आहे, व वाडीबद्दल श्रीमहाराजांना वाटणारें आत्यंतिक प्रेम पाहिलें म्हणजे तेथें त्यांची स्मृति कायम रहाणें आवश्यक



श्रीदत्त मंदिर

होतें असेंच वाटतें. ग्वाल्हेर संस्थानचे अधिपति कै. माधवराव महाराज शिंदे यांच्या आईच्या आई श्रीमंत लक्ष्मीबाई जाधव यांनीं हें स्मृतिमंदिर १९३५ सालीं बांधविलें. वाडी येथील श्रीपादुकांच्या



नरसोबाच्या वाडीचें स्मृतिमंदिर

मंदिराच्या वरच्या बाजूला कांहीं पायऱ्या चढून गेल्यावर हें मंदिर दृष्टीस पडतें. श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब यांनीं केलेल्या व्यवस्थेप्रमाणें येथेंहि महाराजांची नित्य-पूजा होत असते.

## श्रीगरुडेश्वर-मार्ग आणि व्यवस्था :

श्रीगरुडेश्वर हें क्षेत्र नर्मदातटाकीं वसलें आहे. गांव लहानसेंच असून तेथें सुमारें पन्नास घरें आहेत. वस्ती प्रामुख्यानें गुजराथी बांधवांची असली तरी त्यांना मराठी चांगलें समजतें. तेथें जाण्याकरतां मुंबई ते बडोदें या मार्गावर अंकलेश्वर येथें गाडी बदलून राजपिपळा येथें जावें. राजपिपळा स्टेशनापासून एस. टी.ची गाडी मिळते; तींत बसून निघालें कीं आपण गरुडेश्वराच्या समोरच्या तीरावर येऊन पोंचतों. नदी ओलांडून जाण्यास नावा मिळतात.

येथील श्रीदत्तमंदिराच्या आसपास तीन-चार लहान धर्मशाळा आहेत. यात्रेकरूंना तेथें खोली घेऊन रहातां येतें. जवळच श्रीगरुडेश्वर संस्थानच्या विश्वस्तांची कचेरी असून, व्यवस्थापक तेथेंच रहातात. संस्थानानें चालविलेल्या अन्नपूर्णागृहामध्यें सर्व यात्रेकरूंना दिवसांतून एक वेळ विनामूल्य प्रसाद मिळतो. या ठिकाणीं कोणी संन्यासी आल्यास त्यांची नीट व्यवस्था ठेविली जाते; निदान दोन संन्यासी तेथें नेहमीं असावेत अशी विश्वस्तांची इच्छा आहे. व्यवस्थापकांकडे ठराविक रक्कम दिली असतां महाराजांच्या आणि श्रीदत्तात्रेयाच्या मंदिरांत पूजा, अभिषेक, लघुरुद्र इत्यादि करण्याची व्यवस्था होऊं शकते.

गांवांत पोस्ट-ऑफिस असून, लहान लहान दुकानें पुष्कळ आहेत. महाराजांची पुण्यतिथि आषाढ शुद्ध प्रतिपदेला दर वर्षी थाटानें साजरी केली जाते. बाहेरून कोणी हरिदास, पुराणिक किंवा प्रवचनकार आल्यास त्यांचे कार्यक्रम येथें होतात. संस्थानच्या विश्वस्त-मंडळांत महाराष्ट्रीयांबरोबर गुर्जर बांधवांचाहि समावेश असतो. विश्वस्त-मंडळाची मुख्य कचेरी राजपिपळा येथें आहे. संस्थानासंबंधीं पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावा.

श्री. व्यवस्थापक, श्रीगरुडेश्वर संस्थान, मु. पो गरुडेश्वर, ता. राजपिपळा, जि. भडोच ( प. रेल्वे ).

## महाराजांचे प्रमुख शिष्य :

* * * * * * * * * * * *

श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्या शिष्य-मंडळींपैकीं ज्यांनीं महाराजांची श्रेष्ठ परंपरा पुढें चालू ठेवली अशा चार थोर शिष्यांचीं संक्षिप्त चरित्रें पुढें दिलीं आहेत.

### श्रीनृसिंह सरस्वती :

श्रीनरसोबाच्या वाडीच्या दक्षिणेला सदलगा नांवाचें एक गांव आहे. तेथील दीक्षित घराण्यांतील श्री. लक्ष्मणशास्त्री दीक्षित यांना नरसोबाची वाडी येथें शके १७८८ मध्यें चैत्र शु॥ प्रतिपदेला दुपारीं पुत्रलाभ झाला व बारावे दिवशीं मुलाचें नांव 'नारायण' असें ठेवण्यांत आलें. हेच नृसिह सरस्वती किंवा दीक्षितस्वामी होत. स्वामींच्या आईचें नांव अहिल्या असें होतें.

नारायणाचें कांहीं मराठी व इंग्रजी शिक्षणहि झालें होतें. त्यानंतर वाडीच्या संस्कृत शाळेंत कृष्णशास्त्री वष्ट यांचेजवळ दीक्षितांनीं काव्याचा अभ्यास केला व पुढें ते वष्टांच्या आज्ञेप्रमाणें श्रीवासुदेवशास्त्री टेंबे ( म्हणजेच श्रीवासुदेवानंद सरस्वती; पण या वेळीं महाराजांनीं संन्यास घेतलेला नव्हता) यांच्याकडे अभ्यासाकरितां येऊं लागले. शास्त्रीबुवांनीं त्यांना संध्येपासून सर्व आचारधर्माचें शिक्षण देऊन "अनुष्ठान करीत राहा" असें सांगितलें. शास्त्रीबुवांच्या आज्ञेप्रमाणेंच नारायण दीक्षितांचें सर्व वागणें होतें.

लग्न झाल्यावर नारायण दीक्षित गृहस्थाश्रमधर्म सशास्त्र चालवीत होते. तथापि नंतर वडिलार्जित अन्न न घेतां भिक्षान्न मिळवून त्यावरच निर्वाह करावा अशी इच्छा होऊन त्यांनीं

त्यासाठीं श्रीवासुदेवानंद सरस्वतींना पत्र लिहून त्यांची अनुज्ञा मागितली. त्यावर "धैर्य असल्यास इच्छेप्रमाणें करा. आमचा पूर्ण आशीर्वाद आहे," असें महाराजांनीं कळविलें. त्यामुळें तेव्हांपासून स्मार्ताग्नीची उपासना कोरान्न मागून त्यांनीं अनेक वर्षें केली. यासाठीं त्यांना पुष्कळ लोकनिंदा व उपहास सोसावा लागला, पण त्यांनीं आपलें व्रत सोडलें नाहीं. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें पंचमहायज्ञ, देवपूजा, अन्नदान, दत्तभजन इत्यादि गोष्टी ते श्रद्धेनें सतत करीत असत.

पुढें कांहीं काळानें वाडी येथें प्लेगाची साथ आली व त्या साथींत दुर्दैवानें नारायण दीक्षितांची पत्नी वाराणशी व मुलगा राम यांनीं इहलोकींची यात्रा संपविली. दीक्षितांनाहि प्लेगाची गांठ आली होती, पण ते त्या दुखण्यांतून ईश्वरकृपेनें वांचले. लवकरच वैराग्याची तीव्रता वाढून नारायण दीक्षितांनीं दत्तंभट नांवाच्या कुरुंदवाड येथील तपस्वी ब्राह्मणाकडून वाडी येथेंच विधिपूर्वक संन्यासदीक्षा घेतली. या वेळीं दीक्षितांचें वय अडतीस वर्षांचें होतें. नंतर गुरुदर्शनाची तळमळ लागल्यामुळें ते वासुदेवानंदांच्या भेटीसाठीं पायींच ब्रह्मावर्ताकडे जाण्यास निघाले. भेलसा येथें त्यांना महाराजांची भेट झाली. त्यांची हकीकत ऐकल्यावर महाराज म्हणाले, "ठीक झालें, आतां आश्रमधर्माप्रमाणें दंड घ्या व ब्रह्मचिंतन करीत स्वस्थ राहा." त्यावर "आपणांकडूनच दंड मिळावा," अशी दीक्षितांची प्रार्थना ऐकल्यावर महाराज म्हणाले, "तुम्ही वाडीला परत जा व श्रीदत्ताची प्रार्थना करीत राहा.... आम्ही तिकडेच निघालों आहों. तेथें आल्यावर पाहूं."

शके १८२६ च्या फाल्गुन शुद्धांत, संन्यास घेतल्यानंतर प्रथमच चौदा वर्षांनीं महाराज वाडीला परत आले. तथापि तेथें

आल्यावरहि “याबाबत प्रभूंची आज्ञा झालेली नसल्यानें आपणांस दंड देतां येत नाहीं” असें महाराजांनीं दीक्षितांना सांगितलें. हें ऐकून दीक्षितांना अत्यंत खेद झाला व ते रात्रभर महाराजांच्या जवळ अश्रु ढाळीत उभे राहिले. पहांटेच्या सुमारास दंड देण्याबद्दल प्रभूंची महाराजांना आज्ञा झाली, व त्याप्रमाणें महाराजांनीं त्यांना दंड देऊन त्यांचें नांव ‘नृसिह सरस्वती’ असें ठेविलें. हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त मितभाषी, शांत, एकांतप्रिय असून त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ होता. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें वाडींतच श्रीदत्तपूजा, उत्सव इत्यादि कार्यें करींत नृसिह सरस्वती पुष्कळ वर्षें राहिले होते. परंतु पुढें कांहीं कारणामुळें, वाडी सोडण्याबद्दल सद्‌गुरूंची आज्ञा मिळवून ते वाडींतून बाहेर पडले. नंतर त्यांनीं कृष्णेच्या समोरच्याच तीरावरील अमरापूर येथील देवस्थानाचा जीर्णोद्धार करून तेथें ‘श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठ’ ही संस्था स्थापन केली. तिची व्यवस्था हल्लीं विश्वस्तांकडे सोंपविलेली आहे.

महाराजांची कृपा संपादन करून दीक्षितस्वामी कृतार्थ झाले. महाराजांनीं कोणालाहि आपल्या पादुका दिलेल्या नाहींत; तथापि नृसिह सरस्वतीप्रभृति मंडळींची भक्ति पाहून लांकडाच्या पादुका पायांत घालून महाराजांनीं त्यांना दिल्या. वाडीहून अमरापुरास जातांना नृसिह सरस्वतींनीं त्या पादुका आपल्याबरोबर नेल्या. हल्लीं या पादुका अमरापूर येथें अमरेश्वर-मठांत ठेविलेल्या आहेत. श्रीमहाराजांचें दीक्षितस्वामींवर विशेष प्रेम होतें. श्रीमहाराज त्यांचेबद्दल लोकांना सांगत असत कीं, “मी त्याला संध्येपासून शिकविलें आहे. मला त्याचा फार अभिमान आहे.” शृंगेरी मठांतील ब्रह्मानंद नांवाच्या स्वामींना श्रीमहाराज एकदां म्हणाले:- “आपण नृसिहवाडीला कधीं गेलां होतां काय? . .तेथें . . .जीवन्,

मुक्त लक्षणांची मूर्ति तुम्हांला पाहावयास मिळेल. आम्ही तिची तेथेंच स्थापना करून ठेविली आहे." हे उद्गारहि नृसिंह सरस्वतीं-बद्दलच आहेत; त्यांवरून त्यांची पारमार्थिक योग्यता स्पष्ट होते. श्रीमहाराजांचा व नृसिंहसरस्वतींचा पत्रव्यवहार नेहमीं चालत असे व त्यांतील कित्येक पत्रें हल्लींहि उपलब्ध आहेत. या पत्रांवरून श्रीमहाराजांचें आपल्या शिष्यावरील प्रेम व त्याच्या कल्याणाबद्दलची काळजी दिसून येते.

अमरापुरांत राहूं लागल्यानंतर नृसिंह सरस्वतींनीं भक्तांच्या निमंत्रणावरून अनेक ठिकाणीं संचार केला व शेंकडों लोकांना भक्तिमार्गाला लावलें. त्यांनीं अनेक जिज्ञासूंना उपदेशामृत पाजलें व अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण दिलें. ते जेथें जात तेथें अन्नसंतर्पणाचें जणूं मुक्तद्वारच असे. संचारार्थ फिरत असतां महाराज पुण्यांतहि कांहीं दिवस राहिले होते. कै. न. चि. केळकर महाराजांबरोबरच मिरजेला इंग्रजी शाळेंत शिकले. तात्यासाहेबांनीं महाराजांना मुद्दाम आपल्या घरीं नेऊन त्यांचा सत्कार केला. त्या वेळीं महाराज केसरी-कार्यालयांतहि आले होते. पुढें वऱ्हाडांतील अनेक ठिकाणीं संचार करून, कारंजा येथें श्रीदत्तात्रेय-नृसिंहसरस्वतींच्या जन्म-स्थानाचें दर्शन घेऊन महाराज गरुडेश्वराच्या यात्रेला गेले. तेथें कांहीं दिवस राहून सर्व भक्तमंडळींसह ते परत अमरापुरास आले. पुन्हां महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं फिरून महाराज काशीयात्रेला गेले; व काशी, प्रयाग इत्यादि यात्रा आटोपून शेवटीं ते अयोध्येला जाऊन राहिले. त्या वेळीं महाराजांचे एक भक्त प्रसिद्ध गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांनीं, महाराजांनीं अयोध्या सोडून इतर कोठेंहि जाऊं नये अशी त्यांची प्रार्थना केली. त्याप्रमाणें तेथेंच राहून, शके १८४९ च्या आश्विन वद्य सप्तमीला श्रीनृसिंह

सरस्वती अयोध्या येथें समाधिस्थ झाले. स्वामींचे भक्त वाडीचे लक्ष्मणराव बोठे पुजारी हे समाधीच्या वेळीं अयोध्येस होते, त्यांनीं श्रीगुरूंचे पूजेचे देव अयोध्येंतून आणून अमरापुरांत ठेविले.

## श्री. प. प. योगानंद सरस्वती

श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्या अनुग्रहीत शिष्यांपैकीं जे कोणी श्रेष्ठ पदाला पोंचले त्यांच्या नामावळींत श्री. प. प. योगानंद सरस्वती म्हणजेच गांडामहाराज यांचें नांव सर्वप्रथम घ्यावें लागेल. यांना अनेक वर्षें श्रीमहाराजांचा सहवास व सेवा घडली हें यांचें विशेष भाग्य होय.

शके १८२० मध्यें श्रीमहाराजांचा मुक्काम शिनोरास होता. तेथें रामशास्त्री यांना पाठ देत असतांना एक दिवस महाराज म्हणाले, " लवकरच एक नेहमीं भटकत फिरणारा अक्षरशत्रु मनुष्य येणार आहे. " हें ऐकून रामशास्त्र्यांना वाटलें कीं असेल कोणी-तरी पूर्वींचा ओळखीचा माणूस. नंतर दोन-तीन दिवसांनीं एक मध्यम वयाचा गुजराथी ब्राह्मण महाराजांचे दर्शनास आला. पूर्वीं तो व्यापारी म्हणून या भागांत आलेला होता, पण या वेळीं तो अगदीं विरक्त बनून महाराजांकडे आला होता. आठ दिवसपर्यंत महाराज त्याच्याशीं बोलले नाहींत. तो रोज पहांटे स्नान करून महाराजांचे माडीवर एका बाजूला बसून राही. महाराज भिक्षेला निघाले कीं तो वाहेर कोठेंतरी जेवण उरकून पुन्हां महाराज परत येण्याचे आंत तेथें येऊन बसे. पुढें एकदां महाराजांनीं " येथें तूं कां बसून राहातोस ? " असें त्याला विचारलें असतां त्यानें खालील-प्रमाणें आपली हकीकत सांगितली :

" माझी जन्मभूमि सुरतेनजीक तेलंगपूर ही होय. लहानपणीं अल्लडपणामुळें मला लोक गांडा म्हणजे वेडा म्हणत. माझें मूळचें नांव कल्याण आहे. माझें लग्न वयाचे आठवे वर्षींच झालें. शिक्षण झाल्यावर कांहीं दिवस नोकरी केली. पण मनःशांति नसल्यामुळें सत्पुरुषांचे शोधार्थ मद्रासपर्यंत फिरलों, तथापि संतांची भेट झाली नाहीं. माझें उपास्य दैवत महादेव असून मी जातीनें ब्राह्मण आहें, व ब्राह्मण जातीचाच सद्‌गुरु मिळावा अशी माझी इच्छा आहे. घरीं श्रीमंती असून आईबाप जिवंत आहेत; पण कोणत्याहि विषयांत सुख-समाधान कांहीं मिळेना, म्हणून व्यापाराचें निमित्त करून नर्मदातीरावर राहून तेथील ब्राह्मणांची सेवा करण्यांत काळ घालवूं लागलों. याबद्दल वडील मला फार कटु बोलले, म्हणून मी व्यापार बंद केला व वसुलीच्या निमित्तानें घराबाहेर पडलों. नंतर वैराग्याच्या वेषांत ओंकारेश्वराचे झाडींत एका वडाखालीं रहात असतां, मला श्रीपांडुरंग महाराज या सत्पुरुषाची भेट झाली. ते मला म्हणाले, ' अरे या भयंकर अरण्यांत साधु कसे सांपडतील ? तूं नेमावर येथील सिद्धनाथाच्या देवळांत जपानुष्ठान कर म्हणजे तेथेंच तुला सद्‌गुरूचा शोध लागेल !' त्यांच्या आज्ञेप्रमाणे मी नेमावर येथें अनुष्ठान करीत असतां आपली वार्ता समजल्यामुळें आपणांस शरण आलों. तरी आपण माझ्यावर कृपा करून मला कृतार्थ करावें."

या ब्राह्मणास लोक गांडाबुवा असें म्हणत असत. त्यांचें वृत्त ऐकून महाराज नुसते हंसले. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांना बरोबर घेऊन महाराज निकोदा या गांवीं आले व एका शंकराच्या देवळांत गांडाबुवांना रहाण्यास सांगून त्यांना म्हणाले, " तूं येथें शंकरासमोर योगाभ्यास कर. श्रद्धेप्रमाणें शंकर

अनुक्रम........................ वि:


परमात्मा तुला फळ देतील." एवढें सांगून त्यांना योगाभ्यासाची दिशा दाखवून महाराज पुढें गेले. नंतर कांहीं दिवसांनीं दर्शनास आले असतां महाराजांनीं त्यांना आज्ञा केली कीं, " तूं प्रथम आई-बापांकडे जाऊन त्यांची क्षमा माग आणि त्यांची प्रेमानें आज्ञा घेऊन चातुर्मासाचे सुमारास द्वारकेंत माझ्याकडे ये." याप्रमाणें आज्ञा होतांच गांडाबुवा घरीं निघून गेले, व घरीं आईबापांना भेटून, त्यांची परवानगी घेऊन द्वारकेंत महाराजांकडे आले. त्यांनीं महाराजांना सांगितलें कीं, "आईबापांनीं आपणास तीन अटी घातल्या आहेत. मरणाचे वेळीं त्यांचेजवळ उपस्थित असणें, त्यांचें और्ध्वदेहिक कृत्य पार पाडणें व माझ्या मुलीचें लग्न लावून देणें. या गोष्टी करण्याचें वचन घेऊन आईबापांनीं मला जाण्यास परवानगी दिली आहे." त्यावर महाराज म्हणाले, "कांहीं हरकत नाहीं. श्रद्धेप्रमाणें कार्यसिद्धि होऊन जाईल." गांडाबुवांची महाराजांवर पूर्ण श्रद्धा होती, व महाराजांची आज्ञा ते तंतोतंत पाळीत असत.

यानंतर अनेक ठिकाणीं गांडाबुवा महाराजांच्या बरोबर असत. पवनी येथील शके १८३१ च्या चातुर्मासांत व नंतर पुढें धारवाडास ते महाराजांच्या बरोबर होते. धारवाड येथें महाराजांनीं त्यांना भडोचला जाऊन लक्ष गायत्री जप व ब्राह्मणसंतर्पण करण्यास सांगून तेथून भडोचला पाठवून दिलें. जप पूर्ण करून पुढल्या वर्षी गांडाबुवा महाराजांस गलगली येथें येऊन भेटले, व शके १८३३ च्या चातुर्मासांत ते कुरुगड्डी येथें महाराजांबरोबर होते. कुरुगड्डीला बुवांनींच चातुर्मासांत तेथें येणाऱ्या सर्वांच्या जेवणाखाणाची उत्तम सोय केली.

गोपेगांवीं दत्तपादुका स्थापन करून तेथें गांडाबुवांना ठेवावें असें महाराजांच्या मनांत प्रथम होतें, पण तें घडून आलें नाहीं.

गरुडेश्वर येथें गांडाबुवा दर्शनास आले तेव्हां महाराजांनीं त्यांना आशीर्वाद देऊन तिलकवाड्यास पाठवन दिलें. महाराजांच्या सांगण्याप्रमाणें गांडाबुवा संन्यास घेऊन योगानंद सरस्वती हें नांव धारण करून परभणी जिल्ह्यांत गोदावरीच्या कांठीं गुंज या गांवीं जाऊन राहिले व तेथेंच त्यांचें देहावसान झालें. तेथें पादुका स्थापन केल्या असून मोठें दत्तमंदिरहि बांधलें आहे .दर वर्षी फाल्गुन व॥१३ ला या ठिकाणीं हजारों भाविकांची यात्रा जमत असते.

** ** **

## गुरुभक्त श्रीगुळवणी महाराज

कोल्हापूर जिल्ह्यांतील राधानगरी तालुक्यांत कोलव या गांवीं नागेशभटजी गुळवणी हे सदाचारसंपन्न वैदिक रहात असत. यांना गुरुकृपेनें उत्तरवयांत मुलगा झाला, त्याचें नांव त्यांनीं नारायण असें ठेविलें. नारायण पुढें वेदविद्यासंपन्न झाला. नारायणभटजींना चार चिरंजीव होते; पैकीं ज्येष्ठ चिरंजीव वेदमूर्ति दत्तंभट यांना पांच पुत्र व तीन कन्या झाल्या. त्यांतील सर्वांत धाकटे पुत्र म्हणजे श्री. वामनराव होत. वामनरावांच्या आईचें नांव उमाबाई असें होतें. वामनरावांच्या मातापितरांचा पारमार्थिक अधिकार मोठा होता. दर पौर्णिमेला घोड्यावरून तीं श्रीनृसिंहवाडीची वारी करीत.

कोल्हापूर जिल्ह्यांत कुडुत्री गांवीं मार्गशीर्ष व॥ १३ शके १८०८(२३ डिसेंबर १८८६) या दिवशीं गुरुवारीं रात्रीं वामनरावांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण तारळें येथें व हायस्कूलचें शिक्षण कोल्हापूर येथें झालें. इंग्रजी सहावीपासून त्यांनीं चित्रकलेच्या अभ्यासास सुरुवात केली, आणि १९०८ पर्यंत चित्रकलेच्या तीनहि

परीक्षा व १९०९ मध्यें 'टीचर्स ग्रेड'ची परीक्षा त्यांनीं दिली. प्रथम कांहीं काळ कोल्हापुरास व नंतर १९१७ पासून १९२६ पर्यंत वामनरावांनीं बार्शी येथें चित्रकलेचे शिक्षक म्हणून काम केलें. त्यानंतर १९२६ ते १९४२ पर्यंत पुणें येथें नू. म. विद्यालयांत चित्रकला–शिक्षक म्हणून काम करून त्यांनीं उत्तम लौकिक मिळविला.

वामनरावांच्या साधनेची व कुंडलिनी-उत्थापन-सिद्धीची सुरुवात बार्शी येथेंच झाली काशीचे योगानंद नांवाचे एक ब्रह्मचारी योगी तेथें कांहीं दिवस राहिले होते, त्यांच्या प्रेरणेनें वामनरावांनीं बार्शी येथें योगशिक्षणाचा वर्गहि चालविला होता. १९०७ सालीं गुरुद्वादशीला श्रीवासुदेवानंद सरस्वती नरसोबाच्या वाडीला होते. वामनरावांचे बंधु शंकरभटजी यांच्या ओळखीनें वामनरावांना महाराजांचें येथेंच प्रथम दर्शन घडलें. महाराजांनीं प्रसन्न होऊन त्यांना प्रसाद म्हणून एक छोटी चौकोनी पेटी दिली; ती आजहि वामनरावांच्या मनगटावर बांधलेली असते. पुढें दोन वर्षांनीं पवनी येथें शके १८३१ सालच्या अनंतचतुर्दशीला श्रीवासुदेवानंद सरस्वतींनीं वामनराव, त्यांच्या मातुःश्री व भगिनी या सर्वांना अनुग्रह दिला. त्या वेळेपासून आतांपर्यंत सुमारें पन्नास वर्षें वामनरावांचें साधन व उपासना नियमितपणें व निष्ठापूर्वक चाललेली आहे. शके १८३२ म्हणजे इ. १९१० सालीं द. भारतांत हावनूर येथें वामनरावांना पुन्हां महाराजांचा सहवास व सेवा घडली. निरोप घेतांना " परतभेट कधीं होईल ? " या वामनरावांच्या प्रश्नाला, हास्यमुद्रेनें स्वतःच्या देहाकडे बोट करून महाराजांनीं उत्तर दिलें कीं " हें पाहिलें, असेंच लक्षांत ठेवावें." पुढें पिंपरी येथें व शेवटीं श. १८३५ मध्यें गरुडेश्वरीं भेट झाली, त्या वेळीं महाराजांनीं वामनरावांना धौतीक्रिया शिकविली.

वामनरावांची योगविद्येंत पुष्कळ प्रगति झालेली होती, तथापि त्यांत आणखी प्रगति करण्याचा त्यांचा प्रयत्न चालूच असे. नर्मदातीरावर हुसंगाबाद येथें प.प. चिन्मयानंद सरस्वती या तेजस्वी बंगाली स्वामींनीं १९२२ सालीं वामनरावांना वेध-दीक्षा दिली. वेध-दीक्षेनें कुंडलिनी जागृत करणारे योगी म्हणून या स्वामींचा मोठा लौकिक होता. या उज्ज्वल विद्येचा लाभ पुढें वामनरावजींकडून महाराष्ट्रांत व अन्यत्र अनेकांना मिळाला. या दृष्टीनें चिन्मयानंद सरस्वतींच्या अनुग्रहानें वामनरावजींना परिसत्व लाभलें असें त्यांच्या एका मित्रानें म्हटलें आहे, तें अगदीं बरोबर आहे. श्री त्र्यं. भा. खरे यांचा वामनरावजींच्या योगविद्येंतील अधिकाराबद्दलचा लेख 'कल्याण' मासिकांत प्रसिद्ध झाल्याबरोबर त्यांच्याकडे लोकांची रीघ लागली, व तेव्हांपासून शेकडों साधकांना दीक्षा देऊन, त्यांना योगसाधनेचा मार्ग त्यांनीं उपलब्ध करून दिला. एवढें झाल्यावरहि त्यांची शालीनता व चेहेऱ्यावरचें हास्य पूर्वीप्रमाणें कायम आहे. आपल्याकडे आलेल्या व्यक्तीच्या पात्रतेचा विचार करून वामनरावजी दीक्षा देतात; पण त्या वेळीं हार, नारळ, पूजा असल्या बाह्योपचारांना ते काडीचेंहि महत्त्व देत नाहींत. त्यांच्या शिष्यवर्गात अनेक प्रांतांतले, अनेक व्यवसायांचे, आणि समाजांतल्या अनेक थरांतले स्त्री-पुरुष आहेत.

याशिवाय वामनरावजींचें अलीकडील एक मोठें कार्य म्हणजे श्रीमत् वासुदेवानंद सरस्वतींच्या समग्र ग्रंथांचें प्रकाशन हें होय. या ग्रंथांसंबंधीं माहिती या पुस्तकांत अन्यत्र दिलीच आहे. श्री. वामनरावजींनीं हे सर्व ग्रंथ मिळवून, ते बारा खंडांत प्रकाशित केले व श्रीटेंबेस्वामींच्या शतसांवत्सरिक जयंतीच्या सोहळ्यांत श्रावण व. १, शके १८७६ या दिवशीं हैदराबाद येथें मोठा भव्य

समारंभ करून, त्यांनीं ते ग्रंथ गुरुचरणीं समर्पण केले. ही त्यांची गुरुसेवा श्रेष्ठ प्रतीची असून, या ग्रंथांमुळें शेकडों-हजारों साधकांवर त्यांनीं मोठे उपकार करून ठेवले आहेत.

श्री. वामनरावांनीं बद्रीनारायणापासून तों कन्याकुमारी-पर्यंत अनेक यात्रा केल्या आहेत. त्यांचें ब्रह्मचर्यव्रत, तपश्चर्या, गुरुभक्ति, पारमार्थिक योग्यता आणि परोपकारी शांत वृत्ति यांमुळें आतां सर्व लोक त्यांना 'गुळवणी महाराज' असेंच यथार्थतेनें म्हणतात.

## श्रीरंग अवधूत महाराज

श्रीरंग अवधूत महाराज हे श्रीमत् वासुदेवानंद सरस्वतींचे एक ख्यातनाम शिष्य गुजराथेंत आहेत. यांचा जीवनवृत्तान्त मोठा अद्भुतरम्य वाटतो.

श्रीरंग अवधूत यांचें घराणें कोंकणांतले. रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वर तालुक्यांत देवळें नांवाच्या गांवीं जयरामभट वळामे म्हणून एक दशग्रंथी ब्राह्मण रहात. हे अत्यंत विद्वान तसेच अति प्रेमळ असल्यामुळें लोकप्रिय झाले. बाळंभट या नांवानेंच त्यांची प्रसिद्धी होती. यांच्या चौघां मुलांपैकीं विठ्ठलभट हे सर्वांत धाकटे. हे आपल्या वडिलांप्रमाणेंच मोठे धर्मनिष्ठ व भक्तिमार्गी होते. हेहि दशग्रंथी होते. त्यांच्या तरुणपणीं गुजराथमधील गोध्रा शहरीं सखाराम सरपोतदार यांचें एक विठ्ठलमंदिर होतें. त्या मंदिरांत पूजाअर्चा करण्यासाठीं म्हणून येऊन रहाण्याचें विठ्ठलभटांनीं पत्करलें आणि ते कोंकण सोडून गुजराथेंत गेले. त्यांच्या पत्नीचें नांव काशी. त्याहि मोठ्या भक्तिपरायण होत्या. याहि कोंकणां-

तल्याच. विठ्ठलभटांनीं आपल्या शुद्ध आचरणानें व धर्मनिष्ठ वर्तनामुळें तिकडील महाराष्ट्रीय व गुजराथी अशा दोन्ही समाजांत आदराचें स्थान मिळविलें. विठ्ठलभट आणि काशीबाई यांच्या पोटीं जो पुत्र जन्माला तेच श्रीरंग अवधूत.

यांचें नांव मूळ पांडुरंग. वयाच्या नवव्या महिन्यापासूनच ते एखाद्या ज्ञानी माणसासारखे बोलूं लागले. लहानपणींच त्यांना नामाची गोडी लागली. त्यांची नामसाधना अगदीं अल्पवयांतच सुरू झाली. परंतु ज्या वडिलांकडून त्यांना ही उपासना प्राप्त झाली ते, यांना पांचवें वर्ष असतांनाच, अचानक ग्रंथिज्वरानें निधन पावले. यांचा धाकटा भाऊ तर त्या वेळीं अवघा अडीच वर्षांचा होता. या दोघां मुलांना घेऊन त्यांची आई पुढें देवदर्शनासाठीं नरसोबाच्या वाडीला आली. थोरला मुलगा पांडुरंग ( म्हणजे श्रीरंग अवधूत) त्या वेळीं आठ वर्षांचा होता. त्याची मुंज करावी या उद्देशानेंच तीं तिघें वाडीला आलीं होतीं श्रीमत् वासुदेवानंद सरस्वतींचें वास्तव्य या वेळीं वाडीलाच होतें. त्यांच्या दर्शनासाठीं हीं मायलेकरें गेलीं असतां श्रीस्वामी महाराजांनीं पांडुरंगाला विचारलें, " काय रे मुला, तूं कोणाचा ? "

" तुमचा ! " त्या मुलानें चटकन् उत्तर केलें. आणि अंगावरच्या कपड्यानिशींच तो गुरुचरणांवर मस्तक ठेवण्यासाठीं पुढें धांवला. अंगावर कपडे असल्यामुळें त्या वेळीं त्याला गुरुचरणांना स्पर्श करतां आला नाहीं, तरी आपल्यावर श्रीगुरूंचा वरदहस्त आहे अशी जाणीव पांडुरंगाला त्याच वेळीं झाली.

पुढें पांडुरंगाला देवाच्या भेटीची विलक्षण आस लागली. त्यासाठीं त्याचा जीव नुसता तळमळूं लागला. त्याच अवस्थेंत

रात्रंदिवस तो बेहोष राहूं लागला. अशा स्थितींत असतानाच त्याला श्रीदत्तात्रेयांनीं एका सत्पुरुषाच्या रूपानें येऊन "पोथी वाच म्हणजे-शांति मिळेल," असा आदेश दिला. त्याप्रमाणें पांडुरंगानें 'श्रीगुरुचरित्रा'ची पोथी मिळवून पारायणाला प्रारंभ केला.

साधना चालू होती आणि लौकिक अध्ययनहि सुरू होतें. अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेचा विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याति होती. इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषांवर त्यांचें विलक्षण प्रभुत्व होतें. वक्तृत्वकलेचा उत्कृष्ट विकास त्यांच्या ठिकाणीं झालेला होता. वकिलीच्या व्यवसायांत पडते तर धन-मान-प्रतिष्ठा आपल्या पायांनीं चालत आलीं असतीं. परंतु पांडुरंगाचें मन या कशाहि लौकिक व्यवहारांत रमत नव्हतें. साधकावस्थेला इष्ट असेंच त्यांचें सारें रहाणें-वागणें या वेळेपासून असे. त्या कडक धर्माचरणामुळें लोकांनीं त्यांचा उपहास करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याची त्यांना फिकीर नसे. बाह्यतः ते एक विद्यार्थी दिसत; तथापि त्यांच्या अंतःकरणांत मात्र परमेश्वराच्या भेटीची तळमळ लागून राहिली असल्यामुळें त्याचेंच अखंड अनुसंधान असे.

इतक्यांत एक नवीनच घटना घडून आली. मॅट्रिकच्या परीक्षेला अवघे तीन महिने उरले होते. देशांत असहकाराचा लढा पुकारला गेला. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थी नि अध्यापक भराभर बाहेर पडले आणि त्यांनीं स्वातंत्र्यलढ्यांत उडी घेतली. पांडुरंगहि त्याला अपवाद राहिला नाहीं. आणि हातीं घेतलेलें काम कसून पार पाडण्याची प्रवृत्तिच असल्यामुळें पांडुरंगानें या लढ्यांत प्रचारकाची कामगिरी उत्तम रीतीनें बजावली.

ही कामगिरी चालू असतांनाच पांडुरंगाला भयंकर आजारानें; पण गांठलें त्यांतूनहि श्रीदत्तप्रभूंनीं त्यांना सांभाळलें. मग मात्र

त्यांनीं श्रीदत्तप्रभूंच्या भेटीचीच केवळ आस धरून गृहत्याग करावयाचें ठरविलें. आईचें त्याच्यावर अत्यंत प्रेम होतें. तरीपण त्याचा धाकटा भाऊ नारायण आतां घरचा भार सांभाळण्याइतका मोठा झाला होता; आणि पांडुरंगाच्या मनांतील दत्तदर्शनाची तीव्र आकांक्षाहि आईला समजत होती. म्हणून तिनें त्याला तपासाठीं बाहेर जावयाला परवानगी दिली.

याच काळांत गुजराथेंत श्रीवासुदेवानंद सरस्वतींचें नांव सर्वत्र दुमदुमत होतें. ते तर साक्षात् दत्तावतारी समजले जात; त्यांचा दत्तभक्तीचा डांगोरा सर्वत्र ऐकूं येत होता.

पांडुरंगांनीं प्रथम ठरविलें होतें तें हिमालयांत जाऊन तपःनाधना करण्याचें. परंतु तिकडे जाण्याच्या मार्गावर असतांना ते ज्या ज्या संतांना भेटले त्यांनीं त्यांनीं त्यांना इतक्यांत हिमालयांत न जाण्याचाच सल्ला दिला. म्हणून अखेर त्यांनीं नर्मदेच्या तीरावरच कोठेंतरी एकान्तांत रहाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं नारेश्वर हें ठिकाण पसंत केलें. याच स्थानाला कपर्दीश्वर असेंहि नांव आहे. श्रीगणेशानें त्याची स्थापना केली असून तेथेंच त्यानें आराधनाहि केली असल्याचा पुराणांत उल्लेख आहे. हें स्थान अत्यंत दुर्गम असून मनुष्यवस्तीपासून दूर होतें. तेथें त्यांनीं आपल्या साधनेला प्रारंभ केला. या ठिकाणीं त्यांनीं कांहीं योगाभ्यास केला. आणि मुख्यतः श्रीवासुदेवानंदांनीं लिहिलेल्या 'श्रीदत्तपुराणा'चीं एकशेंआठ पारायणें पार पाडलीं. या काळांत ते कंदमुळें व नुसती भाजी खाऊन रहात असत. या अनुष्टानाचें उद्यापन १०८ दिवसांच्या नर्मदा-परिक्रमेनें करावें अशी अंतःप्रेरणा त्यांना होऊं लागली. त्याप्रमाणें परिक्रमेला निघण्याची त्यांनीं तयारीहि केली होती. परंतु " ब्रह्मचारी, दक्षिणेंत जा, गांडा तुझी वाट पहात

आहे " असा सारखा आदेश त्यांना होऊं लागला. त्याप्रमाणें ते दक्षिणेंत येऊन गांडाबुवांना भेटले. त्यांनाहि या बाबतींत आदेश झालेला होता. याचें कारण असें होतें कीं, गांडाबुवांनीं श्रीवासुदेवानंद सरस्वतींचें जें चरित्र मराठींत लिहिलें होतें त्यांत कांहीं भाषादोष राहून गेले असावेत अशी शंका गुजराथी मातृभाषी गांडाबुवांना येत होती. त्याकरितां तो ग्रंथ कोणातरी जाणत्यानें वाचून त्यांत योग्य त्या सुधारणा करायला हव्या होत्या. हीच कामगिरी पांडुरंगावर आदेशानें सोंपविली होती. "तूं काळजी करूं नकोस. मी एक ब्रह्मचारी दक्षिणेंत पाठवीत आहें," असें आदेशयुक्त आश्वासन गांडाबुवांनाहि मिळालेलें होतें.

उभय गुरुबंधूंची भेट झाली व पांडुरंगांनीं तें काम आनंदानें पत्करलें. तरीपण संकल्पाप्रमाणें नर्मदा-प्रदक्षिणा पुरी झाल्यावर मगच तें हातीं घेण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें दक्षिणेंतील तीर्थयात्रा आटोपून ते मोरटक्का येथें गेले व तेथून त्यांनीं प्रदक्षिणेला प्रारंभ केला. या प्रदक्षिणेंत त्यांच्यावर अनेक संकटें आलीं, परंतु गुरुकृपेमुळें ते त्यांतूनहि सुरक्षित राहिले. प्रवासांत ते बहुतेक गूळमिश्रित पाण्यावरच रहात.

नर्मदा-प्रदक्षिणा आटोपल्यावर, श्रीगांडाबुवांनीं मराठींत लिहिलेलें 'श्रीगुरुमूर्ति चरित्र' सुधारून त्याच्या छपाईचें काम पांडुरंगांनीं सुरू केलें. भडोच येथें राहून त्यांनीं तें पूर्ण केलें. याच ठिकाणीं त्यांनीं 'वासुदेवनामसुधा' नांवाचें १०८ श्लोकांचें श्रीवासुदेवानंदांचें छोटें चरित्र लिहिलें व तेंहि छापलें गेलें. त्या वेळपर्यंत दत्तसंप्रदायासंबंधीं गुजराथी भाषेंत फारसें वाङमय नव्हतें. तें तयार करण्याची त्यांना देवाची आज्ञा झाली आणि त्यानंतर थोड्याच काळांत त्यांना श्रीदत्तात्रेयांनीं साक्षात् दर्शन देऊन कृतार्थ केलें. त्याप्रसंगीचें वर्णन श्रीअवधूतांनीं स्वतःच केलें आहे :

श्रुत्वेवेदं दीनमाक्रंदनं स प्रादुर्भूतः शूलखट्वांगधारी ।
भिन्दन्भीमं भीषणं जन्मशूलं पायाद्देवो मौनगर्भोऽत्रिसूनुः ।।

आणि तेव्हांपासून त्यांची स्थिति अशी झाली—

स्मृत्वा स्मृत्वा रूपमत्यद्भुतं तत् ।
पीत्वा पीत्वा तन्मुखोद् गीत सूमम् ।
नृत्यत्येतन्मानसं मोदयुक्तं । निर्भीकं सत्तत्पदालीनमेकम् ।।

या साक्षात्कारानंतर कांहीं दिवसांनीं मृत्यूनेंहि त्यांना आपलें भयंकर स्वरूप दाखविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांनीं त्यांचें स्वागत केलें तें अद्भुतच—

"आयान्तु निर्भयं रोगाः शस्त्रास्त्रसहिताश्च ते ।
प्रहरन्तु यथाशक्ति निश्चलोऽस्मि महानगः ।।"

या उद्गारांतील आत्मविश्वास आणि निर्भीकता स्पष्टच आहे.

श्रीदत्तप्रभूंनीं श्रीरंग अवधूत यांच्या हातून खूप मोठी सेवा घेतली आहे. मराठींतील 'गुरुचरित्र' या प्रासादिक ग्रंथाप्रमाणें गुजराथींत त्यांच्या हातून श्रीदत्तप्रभूंनीं 'श्रीगुरुलीलामृत' हा ग्रंथ तयार करवून घेतला. तो तिकडे अत्यंत लोकप्रिय झालेला आहे. याशिवाय 'पत्रगीता' इत्यादि त्यांचें गुजराथी साहित्य खूपच मोठें आहे.

नारेश्वर येथें आतां त्यांच्या कार्यांतून एक मोठा आश्रमच उभा झाला आहे. श्रीदत्तजयंतीला सुमारें फार मोठा भव्य उत्सव होत असतो. सुमारें २५००० पर्यंत यात्रा जमते.

गुजराथीमधील श्रेष्ठ साहित्यक कै. झवरेचंद मेघाणी यांनीं श्रीरंग अवधूत यांच्याबद्दल मोठ्या गौरवानें लिहिलें आहे.

✢ ✢ ✢

## महाराजांची ग्रंथरचना :

श्रीवासुदेवानंद सरस्वतींचें दिव्य चरित्र हा आधुनिक काळांतील एक चमत्कारच आहे. तथापि त्यांनीं केलेली अफाट ग्रंथरचना हा एक परी त्याहूनहि मोठा चमत्कार मानावा लागेल. साधकांसाठीं अगदीं प्रथमावस्थेपासून तर शेवटच्या अवस्थेपर्यंत उत्तम मार्गदर्शन करणारे, तसेंच इतर सर्व-सामान्य वाचकांनाहि साधनेचा निश्चित मार्ग दाखविणारे अनेक ग्रंथ महाराजांनीं लिहून ठेवले असून तें त्यांचें एक चिरंतन स्मारकच होय. महाराजांचे परम-भक्त श्री.वा.द. गुळवणीमहाराज, पुणें, यांनीं हे सर्व ग्रंथ मिळवून ते बारा खंडांत प्रसिद्ध केले आहेत. महाराजांचें एकंदर वाङ्मय सुमारें साडेपांच हजार पानें भरतील एवढें असून, त्याची माहिती थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे. :

**प्रथम पुष्प :** शिक्षात्रयम् : बाल, तरुण व वृद्ध यांनीं धर्मा-प्रमाणें शुद्धाचरणानें कसें वागावयाचें हें यांत सांगितलें आहे.

**द्वितीय पुष्प :** स्तोत्रादिसंग्रह : भगवान् दत्तात्रेय आणि इतर अनेक देवता यांचीं स्तोत्रें, आरत्या, पदें इत्यादि (संस्कृत व मराठी ).

**तृतीय पुष्प :** सप्तशती गुरुचरित्र, दत्तलीलामृताब्धिसार, माघमाहात्म्य, स्त्रीशिक्षा व गुरुशिष्य-संवाद इत्यादि.

**चतुर्थ पुष्प :** श्रीदत्तमाहात्म्य : संपूर्ण ओवीबद्ध मराठी ग्रंथ. दत्तोपासनेचें रहस्य व थोर दत्तभक्तांचीं चरित्रें.

**पंचम पुष्प :** त्रिशती काव्य व दत्तचंपू : त्रिशतीमध्यें तीनशें श्लोकांत सबंध गुरुचरित्राचें सार असून, दत्तचंपूमध्यें अलकानुग्रह, सहस्रार्जुनानुग्रह व हुंडासुरवध या कथा आल्या आहेत.

**षष्ठ व सप्तम पुष्प** : श्रीदत्तपुराण : (सटीक संस्कृत) आठ कांडांत विभागलें असून, श्रीदत्तात्रेयांनीं अधिकारपरत्वें आपल्या शिष्यांस भक्ति, कर्म, ज्ञान, वैराग्य इत्यादींचें महत्त्व यांत सांगितलें आहे.

**अष्टम व नवम पुष्प** : द्विसाहस्त्री गुरुचरित्र : ( सटीक संस्कृत ) श्रीदत्तात्रेय-अवताराच्या कथा. शेवटीं योगरहस्य व ज्ञानरहस्य.

**दशम व एकादश पुष्प**: श्रीगुरुसंहिता: (समश्लोकी गुरुचरित्र : सटीक संस्कृत ). मराठी श्रीगुरुचरित्र ग्रंथाचें समश्लोकी संस्कृत रूपांतर. प्रत्येक अध्यायाचे आरंभीं एक अध्यायसारसूचक श्लोक.

**द्वादश पुष्प** : श्रीवासुदेवानंद सरस्वतींचें संक्षिप्त चरित्र प्रारंभीं दिलें असून, पुढें वेदनिवेदनी स्तोत्र ( संस्कृत–मराठी भाषांतर ), श्रीकृष्णालहरी ( संस्कृत–मराठी भाषांतर ), पंच-पाक्षिक हा ज्योतिषग्रंथ इत्यादि प्रकरणें आहेत.

(वरील सर्व म्हणजे बारा खंडांची एकत्र किंमत रु. ५१ आहे. चौकशीचा पत्ता–**श्री. मु. बा. भालेराव, २० नारायण पेठ, पुणें २**).

अनुक्रम ... वि: करुणात्रिपदी

## करुणात्रिपदी

महाराजांनीं रचलेली ‘करुणात्रिपदी’ म्हणजे श्रीदत्त-प्रार्थनेचीं तीन पदें सांप्रदायिकांच्या नित्यपाठांत असतात; म्हणून तीं मुद्दाम पुढें दिलीं आहेत :

पद १ : ( चाल—उद्धवा शांतवन कर जा० )

**शांत हो श्रीगुरुदत्ता मम चित्ता शमवी आतां ॥ धृ० ॥ तूं केवळ माता जनिता सर्वथा तूं हितकर्ता । तूं आप्तस्वजनभ्राता सर्वथा तूंचि त्राता ॥ चाल ॥ भयकर्ता तूं भयहर्ता । दंडधर्ता तूं परिपाता । तुजवांचुनि न दुजी वार्ता । तूं आर्ता आश्रय दत्ता । शांत हो० ॥ १ ॥ अपराधास्तव गुरुनाथा जरि दंडा धरिसि यथार्था । तरि आम्ही गाउनि गाथा । तव चरणीं नमवूं माथा ॥ चाल ॥ तूं तथापि दंडिसि देवा । कोणाचा मग करुं धावा । सोडविता दुसरा तेव्हां । कोण दत्ता आम्हां त्राता ॥ शांत हो० ॥ २ ॥ तूं नटसा होउनि कोपी । दंडितांहि आम्ही पापी । पुनरपिही चुकतां तथापी । आम्हांवरि नच संतापी ॥ चाल ॥ गच्छतः स्खलनं क्वापि । असें मानुनि नच हो कोपी । निजकृपा-लेशा ओपी । आम्हांवरि तूं भगवंता ॥ शांत हो० ॥ ३ ॥ तव पदरीं असतां ताता । आडमार्गीं पाउल पडतां । सांभाळुनि मार्गावरता । आणिता न दुजा त्राता ॥ चाल ॥ निज बिरुदा आणुनि चित्ता । तूं पतीतपावन दत्ता । वळे आतां आम्हांवरता । करुणाघन तूं गुरुनाथा ॥ शांत हो० ॥ ४ ॥ सहकुटुंब सहपरिवार । दास आम्ही हें घरदार । तव पदीं अर्पुं असार । संसारा हित हा भार ॥ चाल ॥ परिहरिसी करुणासिंधो । तूं दीनानाथ सुबंधो । आम्हां अघलेश न बाधो । वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ शांत हो० ॥ ५ ॥**

पद २ : ( चाल—इस तनधन की० )

श्रीगुरुदत्ता जय भगवंता। तें मन निष्ठुर न करीं आतां ॥ ध्रु० ॥
चोरें द्विजासी मारितां मन जें। कळकळलें तें कळकळो आतां ॥१॥
पोटशुळानें द्विज तडफडतां। कळवळलें तें कळवळो आतां ॥ २ ॥
द्विजसुत मरतां वळलें तें मन। हो कीं उदासिन न वळे आतां ॥३॥
सतिपति मरतां काकुळति येतां। वळलें तें मन न वळे कीं आतां ॥४॥
श्रीगुरुदत्ता त्यजि निष्ठुरता। कोमल चित्ता वळवीं आतां ॥ ५ ॥

पद ३:

जय करुणाघन निजजन-जीवन। अनसुयानंदन पाहि जनार्दन ॥धृ०॥
निजअपराधें उफराटी दृष्टि। होउनि पोटीं भय धरुं पावन ॥१॥
तूं करुणाकर कधिं आम्हावर। रुससि न किंकर-वरद कृपाघन ॥२॥
वारीं अपराध तूं मायबाप। तव मनिं कोप लेश न वामन॥ ३ ॥
बालक-अपराधा गणी जरी माता। तरी कोण त्राता देईल जीवन ॥४॥
प्रार्थि वासुदेव पदीं ठेवी भा । पदीं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥५॥

ही 'करुणात्रिपदी' श्रीमहाराजांनीं नरसी या गांवीं असतांना, नरसोबाच्या वाडीच्या पुजाऱ्यांकरितां रचून दिली. "या करुणात्रिपदीनें जे कोणी नेहमीं श्रीदत्ताची प्रार्थना करतील, त्यांचेवर आलेलीं सर्व संकटें निरसन होतील व त्यांजवर श्रीदत्त-महाराजांची कृपा होईल," असें आश्वासन श्रीयोगानंदसरस्वती यांनीं स्वतः लिहिलेल्या श्रीटेंबेस्वामींच्या चरित्रांत साधकांना देऊन ठेविलें आहे.

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. ३३२९

REFBK 0003321

REFBK-0003321